# 'नीट' परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना १५ मिनिटे अतिरिक्त वेळ



**नवी दिल्ली :** 'नीट' यूजी पुनर्परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नॅशनल टेस्टिंग एजन्सीने मोठा दिलासा दिला आहे. विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या सुचनेच्या आधारे परीक्षेचा कालावधी १८० मिनिटांवरून १९५ मिनिटांपर्यंत वाढवण्यात आला आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षा पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त १५ मिनिटे मिळणार आहेत. याशिवाय प्रश्नपत्रिकेत रफ वर्कसाठी दिल्या जाणाऱ्या जागेतही वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी विद्यार्थ्यांना दोन पाने उपलब्ध करून दिली जात होती. आता चार पाने रफ वर्कसाठी दिली जाणार आहेत. विशेष म्हणजे डावखुऱ्या विद्यार्थ्यांची सोय लक्षात घेऊन प्रश्नपत्रिकेची मांडणीही बदलण्यात आली आहे. सुरुवातीच्या सूचना पानानंतर दोन रफ वर्कची पाने दिली जातील, तर उर्वरित दोन पाने प्रश्नपत्रिकेच्या शेवटी असतील.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३२५
www.ramprahar.com

◆ शनिवार, १३ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेरे/२

राम ते लोकनेते रामशेठ ठाकूर (लेख)/६

फिफा वर्ल्डकप : मेक्सिकोकडून दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा/८


# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आज 'रयत'तर्फे हृद्य सत्कार

## संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार गौरव

**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता सातारा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा हृद्य गौरव होणार आहे.

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी विधानसभा अध्यक्ष व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे असणार आहेत. त्याचप्रमाणे संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लिहिलेल्या 'रामशेठ नाबाद ७५'





ग्रंथाचे प्रकाशन यावेळी खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे, तर संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या 'अमृतपर्व' स्मरणिकेचे प्रकाशनसुद्धा त्यांच्या हस्ते होईल.

रयत शिक्षण संस्था व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचावे यासाठी 'रयत'चे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात कर्मवीर अण्णांनी सुरू केलेला वसा पुढे नेण्याचे काम रयतसेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर अविरतपणे करीत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असतानाही त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जीवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले. 'रयत'ला मातृसंस्था मानून तिच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजात आदर्श घालून दिला.

सातारा येथे होणाऱ्या सत्कार सोहळ्यास संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शाखाप्रमुख सेवक उपस्थित राहणार आहेत. शिक्षणप्रेमींनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

# काँग्रेस बुडते जहाज -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस हे सध्या बुडते जहाज आहे आणि विरोधी पक्षांमधील नेते इतके हुशार आहेत की, ते या बुडत्या जहाजात कधीच पाय ठेवणार नाहीत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवर भाष्य केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला यशस्वी १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुंबईत शुक्रवारी (दि.१२) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाच्या चर्चांवर टिप्पणी करत उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनाही लक्ष्य केले. 'बेगानी शादी में अब्दुल्ला



दिवाना' अशी राऊत यांची अवस्था असल्याचा टोला त्यांनी लगावला.

विलीनीकरणाच्या सुरू असलेल्या चर्चांवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिशोयक्तीपूर्ण बोलणे राजकारणात योग्य नसते, पण विरोधी पक्षांनी जर काँग्रेसमध्ये विलीनीकरण केले, तर त्याचा फायदा भारतीय जनता पक्षालाच होणार आहे. यामुळे आम्हाला अधिकची 'पॉलिटिकल स्पेस' उपलब्ध होईल.

## तृणमूल आणि राष्ट्रवादीच्या विलीनीकरण चर्चेवर भाष्य

विरोधी पक्ष जेवढा मागे हटेल, तेवढी अतिरिक्त स्पेस भाजप काबीज करेल. त्यामुळे या घडामोडींवर आमची 'वेट ॲण्ड वॉच'ची भूमिका आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशात ३६० अंशाचा बदल घडवून आणल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारच्या विकासकामांची जंत्रीच पत्रकार परिषदेत मांडली. गेल्या १२ वर्षांत मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचा एकही डाग लागलेला नाही. या काळात २५ कोटी जनता गरिबीतून बाहेर आली आहे. देशात आतापर्यंत तीन कोटी 'लखपती दिदी' झाल्या असून आगामी काळात हा आकडा सहा कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

जागतिक स्तरावर मंदीचे सावट असतानाही भारत आज जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. एकेकाळी परदेशी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला आणि कर्जाच्या सापळ्यात अडकण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या भारताची आर्थिक स्थिती आता पूर्णपणे बदलली आहे. भारताकडे सध्या ६७ लाख कोटी रुपयांचा परकीय चलन साठा असून देशावरील एकूण परदेशी कर्जापैकी ९४ टक्के कर्ज एकाच दिवसात फेडण्याची अभूतपूर्व क्षमता आज भारताच्या तिजोरीत आहे, असा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केला.

### 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर विशेष टास्क फोर्स स्थापन

राज्यातील कृषी संकटावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, कोणत्याही निवडणुका डोळ्यासमोर न ठेवता सरकारने ४० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली आहे. यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे पाऊस कमी पडण्याची शक्यता असल्याने राज्य सरकारने विशेष टास्क फोर्स तयार केला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या कृषी सल्ल्यानुसारच पेरण्या कराव्यात, जेणेकरून त्यांच्यावर दुबार पेरणीचे संकट येणार नाही. संकट काळात जनावरांसाठी शासन स्तरावरून वैरण उपलब्ध करून दिली जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

# कोकणातील तीर्थस्थळे जलमार्गांनी जोडली जाणार

## ■ मंत्री नितेश राणे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगडमधील प्रमुख तीर्थस्थळे आता जलमार्गांनी जोडली जाणार आहेत. आंगणेवाडी ते कुणकेश्वर, कुणकेश्वर ते गणपतीपुळे आणि गणपतीपुळे ते पाली अशा प्रसिद्ध श्रद्धास्थानांना ५० ते ३० प्रवासी क्षमतेच्या लहान व वेगवान बोटींच्या माध्यमातून जोडण्याची योजना असून यासाठी आवश्यक जेटी बांधण्याची तयारी वेगाने सुरू आहे, अशी माहिती राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी दिली.

एका विशेष मुलाखतीत बोलताना ना. राणे यांनी राज्याला जलवाहतुकीत अग्रेसर बनवण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा मांडला. मुंबई व लगतच्या महानगर प्रदेशातील (एमएमआर) वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मुंबई वॉटर मेट्रोची संकल्पना राबवण्यात येत असून २०२८पर्यंत याचे तीन ते चार जलमार्ग प्रत्यक्ष सुरू होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबई वॉटर मेट्रोसाठी एकूण २१ जलमार्ग अंतिम करण्यात



आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुंबईतील रेडिओ क्लब ते नवी मुंबई विमानतळ या जलमार्गाचा समावेश आहे. सध्या या प्रवासासाठी सव्वा तास लागतो, मात्र वॉटर मेट्रोमुळे अवघ्या १६ मिनिटांत हे अंतर कापता येणार आहे. गेटवे ऑफ इंडिया ते अलिबाग या पारंपरिक जलमार्गाव्यतिरिक्त आता मुंबईच्या पश्चिम उपनगरातून अलिबाग गाठणे शक्य होणार आहे. पश्चिम उपनगरातील नागरिकांना अलिबागला जाण्यासाठी आधी रेल्वेने अथवा खासगी वाहनाने गेटवे ऑफ इंडियाला यावे लागायचे. त्यांची ही गैरसोय टाळण्यासाठी आम्ही वर्सोवा येथे नवीन जेटी उभारली असून तिचे काम पूर्ण झाले आहे. येथून आता मांडवा आणि अलिबागसाठी जलवाहतूक सेवा सुरू करण्यात येत आहे, असेही ना. राणे यांनी यावेळी सांगितले.

# रायगडात मान्सूनअभावी पेरण्या खोळंबल्या; पाणीटंचाईचेही संकट गडद

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदा देशात मान्सूनचे आगमन वेळेवर झाले असले तरी रायगड जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पावसाची प्रतीक्षा कायम आहे. मान्सूनचा प्रवास मंदावल्याने जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाची चिंता वाढली असून पावसाअभावी भात पेरणीची कामे खोळंबली आहेत. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत, तर पाणीटंचाईचे संकटही अधिक गडद होत चालले आहे.

हवामान खात्याने मान्सून १० जूनपर्यंत मुंबई परिसरात



दाखल होण्याचा अंदाज वर्तविला होता, मात्र १२ जून उजाडूनही रायगडसह कोकणातील अनेक भागांमध्ये मान्सूनचा पाऊस पोहचलेला नाही. केरळ व त्यानंतर सिंधुदुर्गात वेळेवर दाखल झालेला मान्सून पुढे सरकताना मंदावल्याने तो सध्या रत्नागिरी परिसरातच थांबलेला आहे. त्यामुळे रायगडकरांची प्रतीक्षा आणखी वाढली आहे.

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून अधूनमधून ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी अपेक्षित पाऊस पडत नाही. काही वेळ ढग दाटून येतात, विजांचा कडकडाटही होतो, मात्र त्यानंतर पुन्हा कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता वाढून नागरिकांना उकाडा सहन करावा लागत आहे.

रायगड हा भात उत्पादक जिल्हा म्हणून राज्यात ओळखला जातो. जिल्ह्यातील बहुतांश शेतकरी मान्सूनवर अवलंबून आहेत. **(पान २ वर..)**

# माथेरानची मिनीट्रेन येत्या सोमवारपासून मान्सून सुट्टीवर

## अमन लॉज-माथेरान शटल सेवा राहणार सुरू

**नेरळ : प्रतिनिधी**

पर्यटकांचे आकर्षण असलेली नेरळ-माथेरान मिनीट्रेन सेवा पावसाळी सुट्टीवर जाणार आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने याबाबत आदेश जारी केले असून १५ जून ते १५ ऑक्टोबर या चार महिन्यांच्या कालावधीत नेरळ ते अमन लॉजदरम्यानची




नियमित प्रवासी सेवा बंद राहणार आहे. या दरम्यान अमन लॉज ते माथेरानदरम्यानची शटल सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहणार असल्याने पावसाळ्यातही पर्यटकांना माथेरानच्या निसर्गसौंदर्याचा आनंद घेता येणार आहे.

नेरळ ते माथेरान हा रेल्वे सुमारे २१ किलोमीटरचा घाटमार्ग असून या मार्गावर अनेक डोंगरकडे, खोल दऱ्या आणि संवेदनशील उतार आहेत. पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे दरडी कोसळणे, झाडे पडणे किंवा रेल्वे मार्गावर माती वाहून येण्याचा धोका वाढतो. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत दरवर्षी मान्सून काळात ही सेवा तात्पुरती बंद ठेवली जाते.

यंदा पावसाचे आगमन अपेक्षेपेक्षा उशिरा झाले असले तरी मध्य रेल्वेने नियमानुसार जून महिन्यापासून नेरळ-माथेरान मिनी ट्रेन बंद ठेवण्याचा निर्णय कायम ठेवला आहे. त्यामुळे सोमवारपासून नेरळ स्थानकातून माथेरानकडे जाणारी नियमित मिनी ट्रेन धावणार नाही, मात्र पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी अमन लॉज ते माथेरान आणि माथेरान ते अमन लॉजदरम्यान शटल सेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. या सेवेमुळे माथेरानमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पावसाळ्यातील धुक्याने वेढलेले डोंगर, हिरवाईने नटलेले निसर्गरम्य वातावरण आणि विविध पर्यटनस्थळांचा आनंद घेता येणार आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार शटल सेवा नियमितपणे धावणार असून पर्यटकांनी प्रवासापूर्वी रेल्वेच्या अधिकृत वेळापत्रकाची माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


भावपूर्ण श्रद्धांजली



स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

जन्म दि. १ जून १९५२ / मृत्यू दि. ३ जून २०२६

| वार | दिनांक/वेळ | भजन मंडळाचे नाव |
| --- | --- | --- |
| शनिवार | १३/०६/२०२६ (सायं. ४.३० ते ६ वा.) | ज्ञानाई सांस्कृतिक भजन मंडळ (बेलापूर)<br>गायक - भजनरत्न श्री. महादेव बुवा शहाबाजकर<br>पखवाज - श्री. दर्शन नाईक, तबला - कु. गौरव म्हात्रे |
| | सायं. ७ ते ८.३० वा. | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर<br>गुरूवर्य श्री. निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील |
| रविवार | १४/०६/२०२६ (सायं. ७ ते ८.३० वा.) | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे<br>संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर,<br>पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन



सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुडे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



❊ किर्तनकार ❊
ह.भ.प.वैभव बुवा मंडलिक

तुका म्हणे पावठणी । करू स्वर्गाची निशाणी ।।

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार
(न्हावेखाडी)

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.



युवा वर्गाच्या आकांक्षांनी घेतली झेप



२.२ लाख स्टार्टअप्सच्या माध्यमातून युवा वर्गासाठी रोजगार आणि नवोन्मेषाच्या संधींची निर्मिती.

१०,००० + अटल टिंकरिंग लॅब्सच्या माध्यमातून
१.१ + कोटी विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी जोडले गेले.

१२ वर्षे विश्वासाची, विकासाची, जन-कल्याणाची

भारत सरकार



एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री | देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री

# विकसित महाराष्ट्र २०४७साठी विशेष प्रयत्न

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राजधानी दिल्लीत प्रतिपादन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.१२) येथे केले.

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या (गव्हर्निंग कौन्सिल) अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोड मॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९-३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले असून शाश्वत विकास उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करण्यावर राज्याचा भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आकांक्षित जिल्ह्यांची संख्या चारवरून दहापर्यंत आणि आकांक्षित तालुक्यांची संख्या २७ वरून १७७ पर्यंत वाढविण्यात आली असून या भागांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात



समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी 'पोषण भी पढाई भी', आरंभ, स्मार्ट अंगणवाडी आणि सक्षम अंगणवाडी यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. बालस्नेही शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर आणि अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू आहे. शालेय शिक्षणात महाराष्ट्राची परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्समध्ये प्रचेष्टा-१ कडे वाटचाल सुरू आहे. राज्यात २ कोटी आठ लाखांपेक्षा अधिक 'अपार आयडी' तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे, डिजिटल वर्ग, व्यावसायिक शिक्षण तसेच मुली, आदिवासी व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे.

राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. 'महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' विकसित करण्यात येत आहे. तसेच कुशल युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी' ही संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत.शहरी भागांसाठी स्वतंत्र शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून ११ नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे.

महिला सक्षमीकरण हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उमेद अभियानाअंतर्गत राज्यात ५० लाख लखपती दिदी झाल्या असून ही संख्या एक कोटीपर्यंत नेण्याचा मानस आहे. बचत गटांच्या उत्पादनांसाठी १३ जिल्हास्तरीय उमेद मॉल्स उभारण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने ८०० हून अधिक नागरिक आणि व्यवसाय सेवांची प्रक्रिया पुनर्रचना केली आहे. महासारथी आणि महाडीबीटी २.०द्वारे नागरिक सेवा अधिक सुलभ करण्यात येत आहेत. . महाराष्ट्र एआय धोरण २०२६ अंतर्गत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि १.५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी महाॲग्री-एआय धोरण महाॲगएक्स आणि महाट्रेस यांसारखे डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

'एक राज्य, एक जागतिक पर्यटन स्थळ' योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि नाशिक या ठिकाणांचा जागतिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यात येणार आहे. राज्यभरात १०० पर्यटन उप-परिपथ विकसित करण्याचे उद्दिष्ट असून धार्मिक, वारसा, जल, बेट आणि अनुभवात्मक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी स्थापन करण्यास मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

# किल्ले रायगडावरील स्वच्छतागृहे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा

## महाड भाजपची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगड वरती तसेच किल्ले रायगडच्या पायथ्याला व जिजाऊ मासाहेब यांच्या समाधीस्थळी लाखो रुपये खर्च करून सुसज्ज असे शौचालय रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून उभारले गेलेले आहेत. प्रत्येकी जवळपास दीड कोटी खर्चाने उभारण्यात आलेल्या या सौचालयांची देखभाल होत नसल्याने तसेच पाणी नसल्याने, वापराविना पडून आहेत. गडावरती येणाऱ्या पर्यटकांना या शौचालयाचा उपयोग होत नसल्याने पर्यटकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. या प्रकरणी महाड भाजपच्या वतीने या सौचालयांची पाहणी करून सदर शौचालये हि स्थानिक ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावीत अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री होताच किल्ले रायगडच्या संवर्धनासाठी व विकासासाठी ६०० कोटींचा निधी उपलब्ध करून रायगड विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून किल्ले रायगड परिसराचा विकास व किल्ले रायगड संवर्धनाच्या कामांना सुरुवात झाली. या कामांमध्ये किल्ले रायगड वरती येणाऱ्या शिवभक्त व पर्यटकांच्या सोयीसाठी या ठिकाणी स्वच्छतागृह उभारण्यात आली आहेत.

रायगड प्राधिकरणच्या माध्यमातून करोडो रुपयांचा निधी वापरून सुंदर अशी शौचालय या ठिकाणी उभारण्यात आली आहेत. पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी, चित्त दरवाजा, नाणेदरवाजा, किल्ले रायगड बाजारपेठ तसेच समाधीकडे जाणाऱ्या मार्गावरती व समाधीच्या स्थळी ही सौचालय उभारण्यात आलेली आहे. किल्ले रायगडावरती पाणीपुरवठा करणारी कोणती योजना नसल्याने या सौचालयासाठी मुबलक असा पाणीपुरवठा होत नाही. तसेच या शौचालयांची देखभाल कोण करणार ? असा एक प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे सदर शौचालय ही वापराविना पडून आहेत.



करोड रुपये खर्च करून सरकारने बांधलेली ही शौचालये येणाऱ्या पर्यटकांसाठी उपयोगी पडत नसल्याने पर्यटकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. याप्रकरणी महाड भारतीय जनता पार्टीचे महाड विधानसभा प्रमुख बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष निलेश देवगिरकर, माजी तालुका सरचिटणीस महेश शिंदे, विकास दरेकर, सरचिटणीस सागर हिरवे व स्थानिक पदाधिकारी यांनी किल्ले रायगड वरील या शौचालयांची पाहणी करून याप्रकरणी जिल्हाधिकारी यांना सदर शौचालये ही स्थानिक रायगडवाडी व पाचाड ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावी अशी मागणी केली आहे.

यासाठी व्यवस्थेने पाच ते दहा रुपये आकारणी करवी व जिल्हा परिषदने या साठी ग्रामपंचायतीना निधी उपलब्ध करून द्यावा. स्थानिक ग्रामपंचायत या शौचालयांची व्यवस्थित देखभाल करून यामधून तरुणांना देखील रोजगार उपलब्ध होणार आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेऊन या प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊ असे आश्वासन दिले आहे.

# १ ऑगस्टपासून महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक!

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.




या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी.

दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे.

# रायगडच्या समुद्र किनाऱ्यांवर आता सीसीटीव्ही कॅमेरे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पर्यटकांसह परप्रांतिय यांच्यावर नजर ठेवण्यासाठी जिल्ह्यातील बंदरासह पोर्टमधेही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत जेणेकरून संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्यास मदत होईल.

जिल्ह्यात औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. औद्योगिकीकरण वाढत असल्याने रोजगारासाठी वेगवेगळ्या जिल्ह्यातून, राज्यातून कामगार दाखल झाले आहे. वेगवेगळ्या प्रांतातून कामगार म्हणून जिल्ह्यात अनेक मंडळी आले आहेत. याचाच फायदा घेऊन बांग्लादेशी जिल्ह्यात येण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे जिल्ह्यात बांग्लादेशी विरोधी पथकामार्फत कंपन्यांची तपासणी केली जात आहे. कामगारांची माहिती घेतली जात आहे.

औद्योगिकीकरणाबरोबरच पर्यटनाच्या दृष्टीने जिल्ह्याला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. अलिबाग, वरसोली, मांडवा, नागाव,




आक्षी, किहीम, मुरुड, काशीद, रेवदंडा, बोर्ली, दिवेआगर, श्रीवर्धन अशा अनेक समुद्रकिनारी दहा लाखहून अधिक पर्यटक वर्षाला भेटी देतात.

दिवाळी, उन्हाळी सुट्टीबरोबरच शनिवार आणि रविवारी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी पर्यटक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात येतात. वेगवेगळ्या समुद्रकिनारी फिरण्याचा आनंद पर्यटक लुटतात. गेटवे ते मांडवा, भाऊचा धक्का ते मांडवा या सागरी मार्गाने बहुतांश पर्यटक येतात.

जिल्ह्यातील पर्यटकांसह नागरीकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या पर्यटनस्थळांसह लॅन्डींग पॉईंट आणि बंदराच्या ठिकाणी दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

रायगड पोलीस दलाच्या हद्दीत जिल्ह्यामध्ये २८ पोलीस ठाणे आहेत. त्यामध्ये अलिबाग, मांडवा सागरी, मुरूड, वडखळ, श्रीवर्धन, दिघी सागरी, पोयनाड, रोहा व रेवदंडा हे सागरी पोलीस ठाणे आहेत. या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अलिबाग, वरसोली समुद्रकिनारे, रेवस, मांडवा, जंगल, धरमतर, बांगमांडला, दिघी प्रवासी, पीएनपी, सानेगाव, जेएसडब्लू, राजपूरी जेट्टी असून दिघी पोर्ट या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

अलिबाग, मांडवा सागरी, मुरूड, वडखळ, श्रीवर्धन, दिघी सागरी, पोयनाड, रोहा व रेवदंडा हे सागरी पोलीस ठाणे आहेत. या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अलिबाग, वरसोली समुद्रकिनारे, रेवस, मांडवा, जंगल, धरमतर, बांगमांडला, दिघी प्रवासी, पीएनपी, सानेगाव, जेएसडब्लू, राजपूरी जेट्टी असून दिघी पोर्ट या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सानेगाव जेट्टीच्या ठिकाणी १६, दिघी पोर्टच्या ठिकाणी २१, धरमतर पोर्टच्या ठिकाणी ५१, मांडवा जेट्टीच्या ठिकाणी २४ व इतर ठिकाणी आठ, चार, तीन, दोन सीसीटीव्ही कॅमेरे आहेत.

# वाशिवली येथून लहान मुलीसह विवाहिता बेपत्ता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील वाशिवली येथून लहान मुलीसह विवाहित महिला दि. ९ जून २०२६ पासून बेपत्ता झाल्याची घटना घडली असून कुणाल दंडप्राणी साहू (वय ३५) याने आपली पत्नी मिनाक्षी साहू (वय २५)व मुलगी शिवाणी साहू (वय ५) या बेपत्ता झाल्याची खबर रसायनी पोलीस ठाण्यात दिली आहे.

कुणाल साहू हे कामावरून घरी आले असता मुलगी शिवाणी ही मोबाईल घेवून बसली असताना मुलीकडे मोबाईल का दिला म्हणून पत्नी मिनाक्षी हिला बोललो असता आमच्यात वाद झाला या वादामुळे मिनाक्षी साहू ५ वर्षीय शिवाणीला घेवून कुठेतरी निघून गेली आहे.

मिनाक्षी साहू हिचे वर्णन रंगाने सावळी, चेहरा गोल, उंची ५ फूट, अंगामध्ये सफेद रंगाचा पंजाबी ड्रेस निळ्या रंगाचा सलवार, काळ्या रंगाची ओढणी, पायात सफेद रंगाची चप्पल असे वर्णन आहे. तर शिवाणी कुणाल साहू (वय ५) रंगाने सावळी, चेहरा गोल, उंची २.५ फूट, अंगामध्ये घातलेला लाल रंगाचा फ्रॉक, पायात जांभळ्या रंगाची सँडल असे वर्णन असून रसायनी पोलीस ठाण्यामध्ये मिसिंग तक्रार दाखल केली असून पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत असून कोणास आढळल्यास रसायनी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## रायगडात मान्सूनअभावी पेरण्या खोळंबल्या; पाणीटंचाईचेही संकट गडद

जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाची सुरुवात झाल्यानंतर भात पेरणीच्या कामांना वेग येतो, मात्र यंदा पाऊस लांबल्याने शेतकरी पेरणीसाठी आवश्यक तयारी करूनही प्रत्यक्ष कामे सुरू करू शकलेले नाहीत. पाऊस आणखी उशिरा झाल्यास पेरणीचे वेळापत्रक बिघडण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या दक्षिण भागातील पोलादपूर, महाड, माणगाव, रोहा, तळा, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावली होती. या सरींमुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते. मान्सून आता काही दिवसांत दाखल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारल्याने शेतकरी निराश झाले आहेत.

पावसाअभावी जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकटही गंभीर बनले आहे. धरणे, तलाव आणि विहिरींमधील जलसाठा कमी झाला असून जिल्ह्यातील काही गावे आजही टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागात पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून पावसाचा प्रत्येक दिवस उशिरा होत असल्याने टंचाईची तीव्रता वाढत आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत मान्सूनच्या वाटचालीस पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात लवकरच मान्सून दाखल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तोपर्यंत शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आकाशाकडे लागून राहणार आहे.

# कोथुर्डे धरण आटल्याने सिस्केपनी पाच फूट मगरीची केली सुटका

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड तालुक्यातील नांदगाव चौघुलेवाडी येथील एका गोठ्याजवळ मंगळवारी भटकत आलेली ५.५ ते ६ फूट लांबीची खारफुटी मगर सिस्केप संस्था महाडच्या बचाव पथकाने सुरक्षितपणे पकडून नैसर्गिक अधिवासात सोडली.

सिस्केप नुसार, स्थानिक रहिवासी अंकुश पाटील यांचा गोठ्याजवळील मगरीबाबत फोन आला. सीस्केप महाडच्या जलद प्रतिसाद पथकातील साहिल पानवकर, अक्षय भावरे, धर्मेश मेठा, परेश खाडे आणि योगेश गुरव हे सर्व आवश्यक बचाव साहित्य आणि वैज्ञानिक साधनांसह घटनास्थळी धावले. या मोहिमेत अंकुश पाटील, लहू पाटील, परश्या जाधव, राम पाटील आणि अमोल जाधव या ग्रामस्थांनी मदत केली. मगरीला पकडल्यानंतर मानवी वस्तीपासून दूर तिच्या नैसर्गिक अधिवासात नदीमध्ये सोडण्यात आले.



उष्णतेची लाट वन्यजीवांना गावांकडे ढकलतेय सिस्केप सदस्य योगेश गुरव यांनी सांगितले की, गेल्या १५ दिवसांपासून आजूबाजूच्या गावांतील नागरिक वस्तीत मगरी शिरत असल्याच्या तक्रारी वारंवार करत आहेत. सुमारे दोन आठवड्यांपूर्वी रस्त्यावर, जवळच्या जंगलात, गोठ्याजवळ आणि घराच्या आवारातही २७ मगरी दिसल्या होत्या. पथकाने पुढे सांगितले की, कोथुर्डे धरण आता पूर्णपणे आटले आहे. या उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेच्या लाटांमुळे वन्यजीव कोरड्या पडलेल्या नद्या आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रातून बाहेर पडून पाणी आणि निवाऱ्यासाठी जंगलातील झाडी आणि गावांकडे धाव घेत आहेत. स्थानिक वन विभागानेही जनजागृती मोहीम राबवली आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे, संध्याकाळनंतर नदीकाठ टाळण्याचे आणि भटक्या मगरींना त्रास न देण्याचे आवाहन केले आहे.

सिस्केपचे अध्यक्ष आणि रायगड जिल्हा वन्यजीव रक्षक प्रेमसागर मिस्त्री, म्हणाले, "महाड शहरात मगर बचाव केंद्राची तसेच वन्यजीव वाहतूक करणेसाठी वाहन ही तातडीची गरज आहे. जखमी आणि बचाव केलेल्या मगरींना वैद्यकीय उपचार, तपासणी करिता गाडीने आणणे एक आव्हानात्मक काम आहे .शिवाय अहवाल आणि आर.एफ.ओ. आशिष पाटील, महाड यांच्या अधिकृत अधिकाराखाली नोंद ठेवण्यासाठी ते आवश्यक आहे.

## पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी अस्मिता पवार यांचा अर्ज दाखल

**पोलादपूर :** नगरपंचायत पोलादपूरच्या महिला नगराध्यक्षांनी अखेर राजिनामा दिल्याने नगराध्यक्ष पदासाठी अस्मिता उमेश पवार यांचा अर्ज शिवसेना उपजिल्हा संघटक तथा रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण व अर्थ समिती सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत आशूताईंनी मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे नामनिर्देशन पत्र सादर केले.

## दुखवटा

### चंद्रकांत चौधरी




**नवीन पनवेल** : उत्तरशिव येथील चंद्रकांत (भाई) विश्वनाथ चौधरी यांचे १० जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी १९ जून रोजी नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य २२ जून रोजी राहत्या घरी उत्तरशिव येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातू, नात असा मोठा परिवार आहे.

### मंगला ताठरे



**नवीन पनवेल :** आकुर्ली येथील मंगला दयाराम ताठरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर आकुर्ली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले असून त्यांचे उत्तरकार्य १४ जून रोजी राहत्या घरी आकुर्ली येथे होणार आहे. त्यांच्या पच्छात मुले, सुना, नातू असा परिवार आहे.

### वृषाली साखरे



**पनवेल :** येथील ज्येष्ठ पत्रकार घनश्याम मानकामे यांच्या भगिनी वृषाली अरुण साखरे (वय ६०) यांचे गुरुवार, दि.११ जून रोजी पहाटे निधन झाले. त्याच्या पश्च्यात एक पुत्र आहे. येथील अमरधाम स्मशानभूमीत वृषाली यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध स्तरावरील लोक उपस्थित होते.

# जेएनपीए सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर



**उरण : बातमीदार**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) देशातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून आपले स्थान कायम राखत जागतिक बँक आणि एस अँड पी ग्लोबल मार्केट इंटेलिजन्स यांनी प्रकाशित केलेल्या कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स (सीपीपीआय) २०२५मध्ये जागतिक स्तरावर २२वा क्रमांक पटकावला आहे.

सीपीपीआय २०२५ अहवालानुसार, जेएनपीएने बंदराच्या एकूण कार्यकालापैकी ७५% बर्थ ऑक्युपन्सी शेअर नोंदविला आहे तसेच स्टॅटिस्टिकल इंडेक्स मध्ये ५८.९ आणि प्रशासकीय इंडेक्स मध्ये १३८.० गुण प्राप्त करत जेएनपीएने जगातील कंटेनर बंदरांमध्ये २२वा क्रमांक मिळविला आहे.

अहवालात पुढे नमूद करण्यात आले आहे की, २०२० ते २०२५ या कालावधीत सर्वाधिक सुधारणा नोंदविणाऱ्या जगातील अव्वल २० बंदरांमध्ये जेएनपीएने १४वे स्थान मिळविले आहे. या कालावधीत जेएनपीएच्या क्रमवारी गुणांकनात ३२ गुणांची वाढ झाली असून २०२०मधील ६६ गुणांवरून २०२५मध्ये ते ९८ गुणांपर्यंत पोहचले आहे. या लक्षणीय सुधारणेमुळे कामगिरीत सर्वाधिक प्रगती करणाऱ्या जागतिक बंदरांमध्ये जेएनपीएने १४वे स्थान पटकावले आहे.

या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल म्हणाले, "भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर म्हणून जेएनपीएला पुन्हा मिळालेली मान्यता आणि सीपीपीआय २०२५मध्ये सुधारलेले जागतिक स्थान हे कार्यक्षमता विस्तार, जहाजांच्या टर्नअराउंड वेळेत सुधारणा आणि बंदराधारित लॉजिस्टिक्स अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने करण्यात आलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. हा सन्मान संपूर्ण पोर्ट समुदायासाठी अभिमानाचा विषय असला, तरी जागतिक स्तरावरील सर्वोत्तम बंदरांच्या बरोबरीने स्वतःचे सातत्याने मूल्यमापन करत कामगिरी अधिक उंचावण्याची जबाबदारीही त्यातून वाढते. या उल्लेखनीय यशासाठी मी आमचे सर्व टर्मिनल ऑपरेटर्स, शिपिंग लाईन्स, लॉजिस्टिक्स भागीदार, सीमाशुल्क विभाग, कर्मचारी आणि जेएनपीए परिसंस्थेशी निगडित सर्व भागधारकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो."

सीपीपीआय (कंटेनर पोर्ट परफॉर्मन्स इंडेक्स) मध्ये कंटेनर बंदरांच्या कामगिरीचे मूल्यमापन बंदरात जहाजांनी घालविलेल्या प्रत्यक्ष वेळेच्या आधारे केले जाते. या मूल्यांकनात जहाजांचा माप आणि पोर्ट कॉलची वैशिष्ट्ये विचारात घेतली जातात. हे मूल्यांकन प्रामुख्याने ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टिम (एआयएस) आधारित पोर्ट कॉल रेकॉर्ड्सवर आधारित असून त्यासोबत पोर्ट आणि टर्मिनल्सकडील प्रोपायटरी डेटाची जोड दिली जाते. स्टॅटिस्टिकल आणि प्रशासकीय या दोन्ही पद्धतींमधून प्राप्त झालेल्या निष्कर्षांचे एकत्रीकरण करून प्रत्येक बंदरासाठी एकच सीपीपीआय स्कोअर निश्चित केला जातो.

# कळंबोली भाजपच्या नगरसेवकांनी केलेल्या मागणीला आले यश

## महावितरणकडून वीज समस्येवर कार्यवाही



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होत होता याची दखल घेत भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक व पदाधिकारी सर्वांनी कळंबोली एमएसईबी कार्यालयाला धडक दिली व सहाय्यक अभियंता संजय मुंडे यांना तक्रारीचा पाढा वाचला. त्यानंतर संजय मुंडे साहेब यांनी तत्काळ कार्यवाही करून कळंबोलीवरील लोड कमी करण्यासाठी खारघरमधून वीज सप्लाय घेतला. त्यामुळे इथून पुढे कळंबोलीत लाईट जाणार नाही याची त्यांनी सर्वांना हमी दिली.

रोडपाली सबस्टेशनमध्ये उपलब्ध असलेल्या डमी ब्रेकर पॅनलचा वापर करून हौसिंग सबस्टेशनमधील ११ kv सेक्टर-१४ फिडरचा अंदाजे १५० A लोड ११ केव्ही सेक्टर १७ फिडर वर लूप केबलद् टाकून लोड डायव्हर्ट करण्यात आला आहे. सदर डमी ब्रेकरला रिले बसवून फिडर कार्यान्वित करण्यात आला आहे. या कामामुळे रोडपाली सबस्टेशनमधील दोन्ही १० MVA पॉवर ट्रान्सफॉर्मर्सवरील Load Balancing झाले आहे. यापूर्वी ट्रान्सफॉर्मर क्र. २ ओव्हरलोड स्थितीत होता, तर ट्रान्सफॉर्मर क्र. १ अंडरलोड स्थितीत होता. सदर लोड डायव्हर्जननंतर दोन्ही ट्रान्सफॉर्मर्सवरील भार जवळपास समान प्रमाणात वितरित झाला आहे.

याचबरोबर कळंबोली हौसिंग सबस्टेशनचा अंदाजे १५० अँपिअर लोड रोडपाली सबस्टेशनवर घेण्यात आला आहे. रोडपाली सबस्टेशनला खारघर EHV वरून पुरवठा मिळतो, तर हौसिंग सबस्टेशनला तळोजा EHVवरून पुरवठा मिळतो. त्यामुळे प्रणालीची विश्वासार्हता वाढण्यास तसेच लोड व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

या सर्व कामासाठी भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, भटके विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेविका सरस्वती काथारा, शहराध्यक्ष व नगरसेवक अमर पाटील इत्यादी नगरसेवकांनी व पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला होता.

संजय मुंडे यांनी तत्काळ दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम केले त्याबद्दल जनतेने समाधान व्यक्त केले आहे. त्याचबरोबर त्यांनी कंट्रोल रूमचे नंबरसुद्धा सार्वजनिक केले आहेत . सर्वांना विनंती की कधी-कधी HT फॉल्ट, ट्रांसफार्मर फॉल्ट असेल तर कंट्रोल रूमवर एकाच वेळी मोठ्या प्रमाणात कॉल्स येतात, त्यामुळे क्रमांक व्यस्त (Busy) लागल्यास महावितरणची टोल-फ्री सेवा देखील उपलब्ध आहे.

कृपया खालील संपर्क क्रमांक नागरिकांपर्यंत पोहोचवावेत. महावितरण टोल-फ्री सेवा- ००-२३३-३४३५ १८००-२१२-३४३, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजप कामगार युनियनच्या पाठपुराव्याने माथाडी कामगारांच्या पगारात भरघोस वाढ

## उपाध्यक्ष संजय भगत, सरचिटणीस अनिल खोपडे यांचा पाठपुरावा यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मे. बीएलआर लॉजिस्टिक प्रा. लि., उसाटणे-पनवेल या आस्थापनेत काम करणाऱ्या टोळी क्रमांक ३२८६मधील कामगारांच्या मागण्या भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियनच्या वतीने कंपनी व्यवस्थापन आणि मालवाहतूक कामगार मंडळास पाठविण्यात आल्या होत्या. या मागण्यांबाबत कंपनी व्यवस्थापनाबरोबर माथाडी मंडळाच्या बैठकीत प्रदीर्घ चर्चा करून कामगारांच्या पगारात भरघोस पगारवाढीचा



करार युनियनचे उपाध्यक्ष संजय भगत आणि सरचिटणीस अनिल खोपडे यांनी घडवून आणला.

कंपनी व्यवस्थापन ठेकेदार ट्रान्सपोर्ट बोर्डाचे अधीक्षक श्री. पवार, निरीक्षक उत्तम गुजर, टोळी नंबर ३२८६चे मुकादम व कामगार यांच्यासोबत संयुक्त बैठकीत झालेल्या करारामुळे कामगारांच्या पगारात सरासरी १५ हजार ४०० रुपये एवढी वाढ होणार असून मागील थकबाकीची रक्कमदेखील मिळणार आहे.

कंपनीच्या वतीने मुख्य व्यवस्थापक पी.डी. शर्मा, मॅनेजर श्री.बडगा मियॉ, ठेकेदार राजेश शिंगे, टोळी मुकादम किरण शिंगाडे, तुषार माने, धनाजी काळे आणि कामगार यांनी शुक्रवारी (दि. १२) करारावर सह्या केल्या. त्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला

**नवीन पनवेल : बातमीदार**

पनवेल तालुका पोलिसांना मुंजेश्वरी मैदान, खेरणे गाव या ठिकाणी ४५ ते ५० वर्षीय अनोळखी महिलेचा मृतदेह सापडून आला आहे. पोलीस या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

ही महिला अंगाने सडपातळ असून डोक्याचे केस काळे आहेत. चेहरा उभट आणि रंगाने सावळी असून उंची पाच फूट आहे. तिने काळ्या रंगाचा फुलाफुलांचा गाऊन परिधान केला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास अर्चना कुदळे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा.



**पनवेल : ज्येष्ठ उद्योजक कान्हाशेठ ठाकूर (न्हावाखाडी) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निवासस्थानी सुरू असलेल्या भजन मंडळांच्या मालिकेत नवदुर्गा महिला प्रासादिक भजन मंडळ (कोपरा) गायिका शिवमाला पाटील यांनी भजन सेवा केली. त्यांना निलेश पाटील यांनी पखवाज साथ केली. या कलाकारांचा माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी सन्मान केला.**

# खारघरमध्ये लिफ्टमध्ये अडकलेल्या चौघांची अग्निशमन दलाकडून सुटका

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर ३४ बी, ट्युलिप को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी'मध्ये गुरुवारी एका इमारतीच्या लिफ्टमध्ये चार तरुण-तरुणी अडकल्याची घटना घडली. वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे ही लिफ्ट चौथ्या मजल्यावर अडकली होती. मात्र, सिडको अग्निशमन केंद्र खारघरच्या जवानांनी तत्परता दाखवत तब्बल दीड तासांपासून अडकलेल्या या सर्वांची सुखरूप सुटका केली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी खारघर-तळोजा जेल रोड परिसरातील ट्युलिप सोसायटीमधील वीज अचानक गायब झाली. याच दरम्यान इमारतीच्या लिफ्टमधून प्रवास करणारे २ तरुण आणि २ तरुणी (वय वर्षे २० ते २१) लिफ्ट अचानक बंद पडल्याने चौथ्या मजल्यावर अडकले. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन केंद्राला 'रेस्क्यू वर्दी' मिळाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ कारवाई करत त्यांच्याकडील रेस्क्यू टूलमधील 'कटवणी' आणि 'स्प्रेडर'च्या साहाय्याने लिफ्टचा दरवाजा उघडला. लिफ्ट उघडताच आतमध्ये सुमारे १ ते दीड तासांपासून अडकून पडलेल्या चारही जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. वेळेवर मदत मिळाल्याने या तरुणांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा श्वास सोडला आणि प्रशासनाचे आभार मानले. या यशस्वी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये सिडको अग्निशमन केंद्र खारघर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# पावसाअभावी सात गाव, वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

**नवीन पनवेल : बातमीदार**

जून महिन्याची १२ तारीख उजाडली तरी देखील पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे पनवेल तालुक्यात तीव्र पाणी टंचाई जाणवू लागली आहे. प्रशासनाकडून सात गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे, मात्र हे पाणी देखील अपुरे पडत असल्याचे बोलले जात आहे.

उन्हाच्या झळा तीव्र जाणवू लागल्या आहेत. त्यातच पाण्याचे प्रक्षोभ निर्माण झाले असून नागरिकांचे पाण्याविना हाल होत आहेत. जलजीवन मिशन योजना देखील पनवेलमध्ये सपशेल अपयशी झाल्याने पाणी मिळणे दुरापास्त झाले आहे. मोजक्याच ठिकाणच्या जलजीवन मिशन योजना पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे आज देखील नागरिकांना पिण्याची पाण्याची वानवा आहे. पनवेल पंचायत समिती पाणीपुरवठा विभागामार्फत पाणीटंचाई आराखडा पाठवण्यात आला होता त्यानुसार सात गाववाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यात माडभुवन, ताराटेप वाडी, शिवाजीनगर (कसळखंड) शिरढोणपाडा, बेलवाडी (नानोशी) कामठवाडी, गराडा यांचा समावेश आहे. या सात गाव वाड्यांमध्ये नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यातील काही ठिकाणी दररोज टँकरने पाणीपुरवठा होतो तर काही ठिकाणी एक दिवसाआड किंवा आठवड्यातून काही दिवस पाणीपुरवठा होतो.

तालुक्यातील काही सोसायटीमध्ये देखील पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. बोअरवेलला पाणी येत नसल्याने अन्य ठिकाणाहून विकतचे टँकरचे पाणी घ्यावे लागत आहे.

पनवेल तालुक्यातील लोकवस्ती झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत पाण्याचे स्रोत कमी आहेत.

# मालमत्ता कर भरण्याचे पनवेल महानगरपालिकेकडून आवाहन

## ३१ जुलैपर्यंत ५% सवलतीची संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता धारकांसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. दिनांक ३१ जुलै २०२६ पर्यंत मालमत्ता कर भरल्यास चालू मागणीवर ५% सवलत, तर ऑनलाइन पद्धतीने कर भरल्यास अतिरिक्त २% सवलत मिळणार आहे.

या सवलतीचा लाभ घेऊन शहरातील सर्व मालमत्ता धारकांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर वेळेत भरण्याचे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने केले आहे.



**कर वेळेत भरा, सवलतीचा लाभ घ्या आणि शहर विकासात सहभागी व्हा!**

अधिक माहितीसाठी : महानगरपालिका मुख्यालय, पनवेल तथा संबंधित प्रभाग कार्यालय, कर विभाग हेल्पडेस्क:- १८००-२६८-९९६९, Email ID- support@panvelmc.org
अधिकृत वेबसाईट :- www.panvelmc.org
"कर मित्र PMC" मोबाईल अ‍ॅप

मालमत्ता कराची देयके (बिले) तयार करण्यात आली असून त्यांचे वितरण महानगरपालिकेमार्फत युद्धपातळीवर सुरू आहे. महानगरपालिकेने नियुक्त केलेले बिल वितरक कर्मचारी महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व गृहनिर्माण संस्था (सोसायट्या), संकुले याठिकाणी बिल वाटप करत आहेत.

गृह निर्माण संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक प्रवेश व सहकार्य करून वितरण मोहिमेस सहकार्य करावे, जेणेकरून प्रत्येक नागरिकापर्यंत कर देयक वेळेत पोहोचू शकेल. नागरिकांच्या सोयीसाठी मालमत्ता कराचे बिल आता ऑनलाइनही उपलब्ध करण्यात आले आहे.
नागरिकांनी आपली मालमत्ता www.panvelmc.org येथे नोंदवून किंवा "कर मित्र PMC" मोबाईल अ‍ॅपच्या माध्यमातून ऑनलाइन बिल प्राप्त करून कर भरण्याची सुविधा वापरावी, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

आवश्यक असल्यास महानगरपालिका मुख्यालय किंवा संबंधित प्रभाग कार्यालयातूनही बिल उपलब्ध करून घेता येईल. ऑनलाइन कर भरण्यासाठी UPI, QR Code, नेट बँकिंग, डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड असे विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# मोदींच्या १२ वर्षांच्या यशस्वी नेतृत्वाबद्दल दर्ग्यावर सामूहिक दुआ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशसेवेत सलग १२ वर्षांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केल्याच्या निमित्ताने भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांच्या पुढाकाराने पनवेल येथील मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत जमाल शहा बाबा दर्ग्यावर सामूहिक दुआ आणि विशेष प्रार्थना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या उत्तम आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी तसेच त्यांच्या हातून देशहिताची अधिकाधिक लोककल्याणकारी कार्ये घडावीत, या उद्देशाने दर्ग्यावर विशेष दुआ करण्यात आली. जमाल शहा बाबा यांच्या समाधीवर सोनेरी पुष्पजडित चादर अर्पण करून फुलांची पुष्पांजली वाहण्यात आली. देशाच्या प्रगतीसाठी, सर्वधर्मसमभावाच्या वृद्धीसाठी तसेच निसर्गाचे संतुलन अबाधित राहावे आणि भारतभूमीवर समाधानकारक पर्जन्यवृष्टी व्हावी, यासाठीही सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

कार्यक्रमानंतर उपस्थित नागरिकांना मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. तसेच पंतप्रधान मोदी यांच्या "एक झाड माँ के नाम" या अभियानाला पाठिंबा दर्शवत वृक्षारोपण केलेल्या झाडांची पाहणी करण्यात आली. झाडांना पाणी घालून त्यांची निगा राखण्यात आली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना सय्यद अकबर यांनी २०१४ पासून मोदी सरकारने राबविलेल्या विविध जनकल्याणकारी आणि विकासात्मक योजनांचा उल्लेख केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप अल्पसंख्यांक मोर्चाने समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून संघटनात्मक बळकटी निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी, साबीर शेख, दर्गा ट्रस्टी सीजान फकीर मुजावर, सय्यद अकबर मित्रपरिवार, अल्पसंख्यांक समाजातील कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून सर्वांचे तोंड गोड करण्यात आले.

# सिद्धिविनायक पुनर्विकासात देऊबाई पाटील यांच्या स्मारकाची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री सिद्धिविनायक मंदिराच्या ५०० कोटींच्या भव्य पुनर्विकास प्रकल्पात मूळ मंदिर निर्मात्यांचा सन्मान व्हावा, या मागणीसाठी आगरी समाज विकास संघाच्या शिष्टमंडळाने पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन सादर केले आहे.

दिलेल्या निवेदनात संघटने म्हटले आहे की, प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराची स्थापना १९ नोव्हेंबर १८०१ रोजी झाली. माडुंगा येथील सधन आगरी महिला देऊबाई पाटील यांनी स्वतःच्या संपत्तीतून हे मूळ मंदिर उभारले. बांधकामाचे कंत्राट लक्ष्मण विठू पाटील यांनी पार पाडले. आज हे मंदिर जगातील सर्वाधिक श्रीमंत देवस्थानांपैकी एक बनले आहे. महाराष्ट्र शासनाने मंदिराच्या ५०० कोटी रुपयांच्या पुनर्विकासाचे भूमिपूजन करून कौतुकास्पद पाऊल उचलले आहे.

## संपादकीय

# आत्मनिर्भरतेकडे एक पाऊल

भारत दरवर्षी मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करतो. त्यामुळे परकीय चलनाचा मोठा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर आयात खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करून देशातील ऊर्जा सुरक्षेला बळकटी देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रसरकारने ई-८५ म्हणजेच ८५ टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलच्या वापराला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला असून तो स्वागतार्हच आहे. ऊर्जा स्वावलंबन, पर्यावरण संरक्षण आणि शेतकरी सक्षमीकरण यांचा समन्वय साधणारे हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**अमेरिका-इस्रायलचे इराणविरोधातील युद्ध अद्यापही सुरूच असून त्यामुळे जगभरात इंधन दरवाढीचा भडका उडाला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रातील मोदी सरकारने ‘ई-८५’ हे जैव इंधनावर आधारित मिश्र इंधन सादर केले आहे. त्यात ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल असून त्याची किंमतही पेट्रोलपेक्षा २० रुपयांनी कमी ठेवण्यात आली आहे. मिश्र इंधनाची किंमत कमी असल्याने देशातील त्याची परिसंस्था वेगाने विकसित होण्यास मदत होणार आहे. पेट्रोलपेक्षा सुमारे २० रुपये स्वस्त असलेले ई-८५ इंधन ग्राहकांसाठीही परवडणारे ठरणार आहे. त्यामुळेच देशाच्या जैवइंधन प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा म्हटला जातो आहे. आखातातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनदरांत वाढ होत असताना हा पर्याय लोकप्रिय होण्याची शक्यता आहे. इथेनॉलसारख्या स्वदेशी इंधनाच्या वापरामुळे आयात कच्च्या तेलावरील परकीय चलनाचा खर्च कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर ऊस, मका आणि इतर कृषी उत्पादनांपासून तयार होणाऱ्या इथेनॉलमुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधनही उपलब्ध होणार आहे. आजवर अन्नदाता असणारा शेतकरी यापुढे आपल्यासाठी इंधनदाताही बनणार आहे. शेतकऱ्यांना समृद्ध करणारा आणि विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय आहे. ई-८५ इंधनामुळे देशातील इथेनॉल उत्पादनाला मोठी चालना मिळणार असून देशातील इथेनॉलचा पूर्ण क्षमतेने वापर झाल्याने यातून आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही गती मिळणार आहे. या मिश्र इंधनामुळे कार्बन उत्सर्जनात घट होऊन पर्यावरणालाही फायदा होणार आहे. कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनात सुमारे ६६.४ लाख टनांची घट होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. हवामान बदलाच्या आव्हानांशी सामना करताना स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर ई-८५चा विस्तार हा दूरदृष्टीचा निर्णय ठरतो. अर्थात, या उपक्रमाच्या यशासाठी वाहन उत्पादक, इंधन वितरण यंत्रणा आणि ग्राहक यांच्यात प्रभावी समन्वय आवश्यक राहील. वाहनांचे इंजिन आणि इंधन परस्परपूरक नसतील तर वाहनाच्या देखभालीचा व दुरुस्तीचा खर्च वाढू शकतो. त्यामुळे फ्लेक्स-फ्युएल वाहनांची उपलब्धता वाढविणे आणि जनजागृती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मारुती सुझुकी आणि हिरोमोटोकॉर्प यांसारख्या वाहनउत्पादक कंपन्यांनी या मिश्र इंधनावर चालणारी वाहने बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. यामुळेही ई-८५ इंधनाचा वापर वाढण्याची शक्यता आहे. भविष्यात एकूण वाहन विक्रीत मिश्र इंधनावरील वाहनांचे प्रमाण ५० टयांवर गेल्यास त्यातून वर्षाला ३२१ कोटी लिटर इथेनॉलची मागणी निर्माण होईल असे म्हटले जाते आहे. यामुळे शेतकऱ्यांना दरवर्षी सुमारे १२ हजार ४०० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. ऊर्जा स्वावलंबन, शेतकरी कल्याण आणि पर्यावरण संवर्धन या तिन्ही उद्दिष्टांना एकाच वेळी चालना देणारा ई-८५ पेट्रोलचा उपक्रम भारताच्या प्रगतीच्या प्रवासातील एक सकारात्मक आणि आशादायी टप्पा ठरू शकतो.**

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व प्र.के. अत्रे



मराठीतील अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपट निर्माते-दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते प्रल्हाद केशव अत्रे यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज पुण्यतिथी...

प्र.के. अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी सासवड (जिल्हा पुणे) येथे झाला. त्यांचे शिक्षण सासवड, पुणे, मुंबई व लंडन या ठिकाणी बीए, बीटी, टीडीपर्यंत आहे. नंतर पुण्यातील कँप एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत प्रथम शिक्षक व पुढे प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. तेथे असतानाच राजा धनराज गिरजी हायस्कूल (१९२७) व मुलींचे आगरकर हायस्कूल (१९३४) या शाळांच्या संस्थापनेत भाग घेतला. पुण्याच्या नगरपालिकेचे काही काळ ते सदस्य होते. १९३३पासून नाट्यक्षेत्रात व पुढे चित्रपटसृष्टीतही त्यांनी प्रवेश केला. १९३९नंतर त्यांनी मुंबईला स्थलांतर केले. १९४०मध्ये सुरू केलेल्या साप्ताहिक नवयुगपासून अखेरपर्यंत वृत्तपत्रक्षेत्रातच ते राहिले. याचबरोबरच अत्रे थिएटर्स या नाट्यसंस्थेमार्फत रंगभूमीशीही त्यांचे व्यावसायिक संबंध होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांनी आपली वाणी व लेखणी यांद्वारे मोठे कार्य केले.

प्रथम ‘मकरंद’ व नंतर ‘केशवकुमार’ या टोपणनावांनी काव्यलेखन. झेंडूची फुले (१९२५) हा त्यांच्या विनोदी व विबंडन-कवितांचा संग्रह. त्यात जुन्या वळणाचे विशेषतः ‘रविकिरणमंडळा’ चे कवी व त्यांच्या कविता यांतील लकबांचे व वैगुण्यांचे विडंबन केलेले आहे. आधुनिक मराठीतील विडंबनकाव्याची परंपरा उपर्युक्त काव्यसंग्रहापासून मानण्यात येते. बालकवी व गोविंदाग्रज यांच्या कवितांचा ठळक परिणाम दाखविणारी त्यांची अन्य स्फुट कविता गीतगंगा (१९३५) या संग्रहात आहे.

अत्रेंच्या नाट्यलेखनाचा पहिला कालखंड १९३३ ते १९६० हा होय. मराठी रंगभूमीची हा अवनतकाळ होता. संगीत नाटके व नाटककार तसेच गायक नटवर्ग यांची परंपरा खंडित व निष्प्रभ झाली होती. चित्रपटसृष्टीचा वाढता प्रभाव मराठी रंगभूमीस अनिष्ट ठरला होता. आर्थिक मंदीमुळेही रंगभूमीचा लोकाश्रय कमी होत होता. नाट्यविषयक अभिरूचीतही परिवर्तन घडत होते. अशा काळात अत्र्यांची मुख्यतः प्रहसनात्मक व विनोदी नाट्यदृष्टी आणि अवनत मराठी रंगभूमीच्या तात्कालिक गरजा यांचा चपखल मेळ बसला. विशेष यशस्वी झालेल्या त्यांच्या एकूण बारा नाटकांपैकी दहा नाटके प्रहसनात्मक व विनोदप्रचुर आहेत. गुरुस्थानी मानलेले गडकरी व फ्रेंच प्रहसनकार मोल्येर यांचा प्रभाव त्यांच्या नाटकांवर पडलेला दिसतो. त्या नाटकांत सामाजिक दोषदर्शन व दंभस्फोट आहेत पण उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या द्वारा ते प्रकट केले आहेत. साष्टांग नमस्कार (१९३३), भ्रमाचा भोपळा (१९३५) व लग्नाची बेडी (१९३६) ही त्यांपैकी काही लोकप्रिय नाटके होत. घराबाहेर (१९३४) व उद्याचा संसार (१९३६) ही त्यांची विशेष गंभीर व सामाजिक समस्यात्मक नाटके आहेत. त्या काळात विशेष अनुकरणीय ठरलेल्या इब्सेन या नॉर्वेजियन नाटककाराचा संस्कार वरील दोन नाटकांवर झाल्याचे जाणवते.

अवकळलेल्या मराठी रंगभूमीचा लोकाश्रय टिकवून ठेवण्यात अत्र्यांची नाटके यशस्वी झाली. १९६० नंतरच्या दुसऱ्या कालखंडातील त्यांची महत्त्वाची नाटके म्हणजे तो मी नव्हेच (१९६२) व डॉक्टर (१९६७) ही होत. सत्यसृष्टीतील खळबळजनक घटनांवर ती आधारलेली आहेत. तंत्रदृष्ट्या प्रगत मराठी रंगभूमीचे दर्शनही त्यांत घडते. वर्तमानकालीन अशा नाट्यात्म घटनांची अभिज्ञता अत्र्यांना स्वभावतः होती. या कालखंडातील त्यांची लोकप्रिय नाटके पूर्वकालीन नाटकांच्या तुलनेने अधिक प्रत्यक्षदर्शी आहेत. मराठी रंगभूमीवरील अखंड प्रयोगशीलतेच्या व तीव्र स्पर्धेच्या या कालखंडातही त्यांची सर्वच नाटके लोकप्रिय ठरली.

अत्रे यांचे कथात्मक साहित्य त्यांच्या विडंबनकाव्यासारखे वा नाटकांसारखे प्रभावी ठरले नाही. विनोदी कथा लिहूनही विडंबनकाव्याप्रमाणे अशा कथांची परंपरा मात्र त्यांना निर्माण करता आली नाही. त्यांचे चांगले कखात्मक साहित्य काहीसे गंभीर व वास्तवपूर्णच आहे. त्यात चांगुणा (१९५४) ही कादंबरी व बत्ताशी व इतर कथा (१९५४) यांचा समावेश होतो.

विविध विषयांवर अत्र्यांनी केलेल्या लेखनात लहानमोठी चरित्रे, व्यक्तिदर्शने, मृत्यूलेख, प्रवासवर्णने, वृत्तपत्रीय लेख, साहित्यविषयक लेख आणि भाषणे, शालेय पाठ्यपुस्तके इत्यादींचा समावेश होतो. महात्मा फुले (१९५८), पंडित जवाहरलाल नेहरूंवरील सूर्यास्त (१९६४), समाधीवरील अश्रू (१९५६), केल्याने देशाटन (१९६१), अत्रे उवाच (१९३७) ललित वाङ्मय (१९४४), हशा आणि टाळ्या (१९५८) ही त्यांची काही उल्लेखनीय पुस्तके होत. त्यांच्या नवयुग वाचनमाला (१९३७) व सुभाष वाचनमाला (१९६२) यांनी-विशेषतः पहिल्या मालेने-मराठी भाषासाहित्यविषयक शालेय पाठ्यपुस्तकाचा मराठीत एक आदर्शच निर्माण केला. अप्रकाशित गडकरी (१९६२) हा त्यांनी संपादित केलेला ग्रंथ अभ्यसनीय आहे.

मी कसा झालो? (१९५३) हे त्यांचे वाङ्मयीन आत्मशोधन होय. अत्र्यांनी आपले जीवननाट्य अत्यंत रसाळ व भावपूर्ण शैलीने प्रस्तुत पुस्तकात निवेदन केले असल्याने मराठी आत्मचरित्रपर साहित्यात त्यास विशेष महत्वाचे स्थान आहे. कऱ्हेचे पाणी या पाच खंडांतील (१९६३, १९६४, १९६५, १९६७ व १९६८) विस्तृत आत्मचरित्रात आपली जीवनकथा त्यांनी सांगितली आहे.

अत्र्यांच्या स्वतंत्र वृत्तपत्रव्यवसायाचा आरंभ साप्ताहिक नवयुगपासून (१९४० ते १९६२) झाला. १९४३-१९४४मध्ये समीक्षक मासिकाच्या गडकरी विशेषांकाचे व दिवाळी अंकाचे संपादनही त्यांनी केले. १९४७ ते १९४८ या वर्षांत जयहिंद नावाचे एक सायंदैनिकही त्यांनी चालविले. तुकाराम (१९५४) नावाचे साप्ताहिकही त्यांनी काढले होते. १९५६मध्ये सुरू केलेल्या दैनिक मराठाचे ते अखेरपर्यंत संपादक होते. त्यांच्या वृत्तपत्रीय शैलीवर संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकरांचा फार मोठा परिणाम जाणवतो. मराठी चित्रपटसृष्टीत पटकथालेखक म्हणून व पुढे स्वतंत्र निर्माते म्हणून अत्र्यांनी महत्त्वाचे कार्य केले. धर्मवीर, प्रेमवीर, ब्रह्मचारी व ब्रँडीची बाटली हे त्यांचे काही लोकप्रिय चित्रपट होत. त्यांच्या श्यामची आई या चित्रपटास राष्ट्रपतींचे सुवर्णपदक (१९५४) व महात्मा फुले या चित्रपटास रौप्यपदक (१९५५) मिळाले. नाटकांप्रमाणेच अत्र्यांच्या चित्रपटांचा आरंभ विनोदाने झाला व परिणती गांभीर्यात झाली. त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा (१९५८) प्रसिद्ध झालेल्या आहेत.

अत्रे यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विकास संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात झाला. वक्तृत्व व वृत्तपत्र ही राजकीय कार्याची त्यांची प्रभावी साधने होती. लोकप्रिय वक्ते म्हणूनही अत्र्यांचा लौकिक होता. त्यांचे वक्तृत्व हशा व टाळ्या यांनी गाजत असे.

प्रक्षोभक वादांसाठीही अत्रे प्रसिद्ध होते. भा.वि. वरेरकर, श्री. म. माटे, ना.सी. फडके, पु. भा. भावे वगैरे व्यक्तींशी झालेले त्यांचे तीव्र वाद महाराष्ट्रात गाजले होते. अत्र्यांचे व्यक्तिमत्व गतिमान होते. अशा व्यक्तिमत्वाची स्वाभाविक गरज म्हणूनच त्यांचे अनेकांगी कर्तृत्व निर्माण झाले. त्यांची विनोदबुद्धी त्यांच्या सर्व कर्तृत्वक्षेत्रांत आढळते. विनोदकार म्हणूनच ते अधिक लक्षात राहतात. त्यांची लेखनशैली त्यांच्या व्यक्तिमत्वाची निदर्शक असून तिच्यात एक प्रकारचा अस्सल मराठमोळेपणा जाणवतो.

नाशिक येथे १९४२ मध्ये भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अडतिसावे नाट्यसंमेलन (बेळगाव, १९५५), दहावे मराठी पत्रकार-संमेलन (१९५०) आणि बडोदे, इंदूर व ग्वाल्हेर येथील प्रादेशिक साहित्यसंमेलने यांची अध्यक्षपदेही त्यांनी विभूषित केली होती. मुंबई येथे १३ जून १९६९ रोजी ते निधन पावले.

**-रा.ग.जाधव**
**(मराठी विश्वकोष)**

## बदलते तंत्रज्ञान

# सावधान! आता आलाय ‘सायलेंट कॉल स्कॅम’

आजकाल अनेक लोकांना अनोळखी नंबरवरून वारंवार फोन येतात. कॉल रिसिव्ह करून जसं आपण ‘हॅलो’ म्हणतो, तसंच समोरून कॉल कट होतो. हा प्रत्यक्षात एक ‘सायलेंट कॉल स्कॅम’ आहे. गृह मंत्रालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या I४C च्या ‘सायबर दोस्त’ या एजन्सीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून याबद्दल माहिती दिली आहे.



सायलेंट कॉल स्कॅमअंतर्गत स्कॅमर्सचा ग्रुप हे तपासतो की कोणते मोबाईल नंबर सध्या ‘ॲक्टिव्ह’ आहेत. यासाठी ते ऑटोमेटेड सिस्टमचा वापर करतात. तुम्ही कॉल उचलून ‘हॅलो’ म्हणताच सिस्टमला समजतं की हा नंबर सुरू आहे आणि कॉल आपोआप कट होतो. ‘सायबर दोस्त’ने दिलेल्या माहितीनुसार या प्रक्रियेनंतर तुम्हाला सायबर फ्रॉडचे फोन येण्याचं प्रमाण वाढू शकतं. यामध्ये तुम्हाला घाबरवून ‘डिजिटल अरेस्ट’ करण्याचा प्रयत्नही केला जाऊ शकतो.

### सायलेंट कॉल स्कॅमपासून कसा करावा बचाव?

अनोळखी नंबर्स ब्लॉक करा : जर एखाद्या अनोळखी नंबरवरून वारंवार कॉल येत असतील, तर तो नंबर त्वरित ब्लॉक करा.

परत कॉल करू नका : ‘हॅलो’ म्हटल्यावर जर कॉल कट झाला, तर त्या नंबरवर चुकूनही ‘कॉल बॅक’ करू नका.

स्पॅम कॉल्स ओळखा : सध्या टेलिकॉम कंपन्या अनोळखी नंबर्सवरून येणाऱ्या कॉलवर ‘स्पॅम’ असं दाखवतात. असा कॉल उचलणं टाळा.

तक्रार नोंदवा : अशा संशयास्पद नंबरची राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर तक्रार करा. पोर्टलवरील ‘Check & Report’ सेक्शनमध्ये जाऊन तुम्ही रिपोर्ट करू शकता.

### सायबर चोरांपासून सावध राहा

सायबर चोर लोकांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या शोधत असतात. त्यामुळे अनोळखी नंबरवरून येणारे कॉल्स, मेसेज आणि लिंक्सपासून दूर राहा. हे सायबर चोर तुमची वैयक्तिक माहिती चोरी करू शकतात किंवा तुमचं बँक खातं रिकामं करू शकतात.

# शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर



## निमित्त

वास्तववादी शैलीत दर्जेदार स्मारकशिल्पे घडविणारे आधुनिक काळातील एक ख्यातकीर्त महाराष्ट्रीय शिल्पकार म्हणजे विनायक पांडुरंग करमरकर. नानासाहेब या नावाने ते अधिक परिचित होते. आज त्यांचा स्मृतिदिन त्यांचा जन्म अलिबागजवळील सासवणे (तत्कालीन जि. कुलाबा, सांप्रत जि. रायगड) येथे २ ऑक्टोबर १८९१ रोजी झाला. गणपतीच्या मूर्ती घडविणे हा त्यांच्या कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय होता.

साहजिकच बालवयातच विनायक करमरकर यांना कलेची आवड निर्माण झाली तसेच चित्रकलेतदेखील त्यांना गती होती. ते देवळातील भिंतींवर चित्रे काढत असत. ही चित्रे तत्कालीन कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी ओटो रॉथफिल्ड यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी करमरकरांना सर. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे कलेचे शिक्षण घेण्यास आर्थिक मदत देऊन प्रवृत्त केले (१९१०). त्यांनी जी.डी. आर्ट ही पदविका घेतली (१९१३). ‘जे.जे.’मध्ये त्यांना उत्तम शिल्पकृतीबद्दल लॉर्ड मेयो पदक मिळाले. याच काळात त्यांची ओळख सर्जन डॉ. भाजेकर आणि रवींद्रनाथ टागोरांचे नातू सुरेंद्रनाथ यांच्याशी झाली व त्यांच्या आग्रहाखातर ते कोलकात्याला गेले. तेथे त्यांनी झांवबझार येथे स्वतःचे कलामंदिर (स्टुडिओ) उभारले. याच सुमारास त्यांनी पूर्वाश्रमीच्या येसू परांजपे या युवतीशी लग्न केले (१९१८).

करमरकरांनी बेलूर मठातील रामकृष्ण परमहंसांचा पुतळा बनविला (१९१६-२०). त्यामुळे त्यांना बरीच कामे मिळू लागली. त्यांनी शास्त्रज्ञ पी.सी.रे, देशबंधू चित्तरंजनदास यांची व्यक्तिशिल्पे केली. महात्मा गांधीजींना समोर बसवून त्यांचे शिल्प केले. व्यावसायिकदृष्ट्या ते कोलकात्यात स्थिरावले असतानाच उच्च शिक्षणासाठी ते लंडनला गेले (१९२०). यासाठी वाडिया व टाटा ट्रस्ट यांच्याकडून कर्जाऊ शिष्यवृत्ती तसेच भाजेकर, राव, शिल्पकार म्हात्रे यांचे आर्थिक साहाय्य घेतले. लंडन येथील रॉयल अकॅडमी ऑफ आर्टमधून उच्च शिल्पशिक्षण, विशेषतः ब्राँझ कास्टिंगचे तंत्र, त्यांनी आत्मसात केले. प्रसिद्ध चित्र-शिल्पकारांच्या भेटी व त्यांच्या कलाकृती पाहण्यासाठी त्यांनी फ्रान्स, इटली व स्वित्झर्लंडचे दौरे केले आणि नंतर ते भारतात परतले (१९२२). करमरकर यांनी साकारलेल्या शंखध्वनी करणाऱ्या युवतीच्या शिल्पास फाइन आर्ट सोसायटीचा (कोलकाता) प्रथम पुरस्कार मिळाला. नंतर त्यांनी गोंडल (सौराष्ट्र), बडोदे व अखेरीस मुंबई येथे शिल्पव्यवसाय सुरू केला (१९२५).

अखिल भारतीय शिवस्मारक समितीचे अध्यक्ष कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी करमरकरांना पुणे येथील अश्वारूढ शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम दिले. करमरकरांनी एकसंध ओतकामाचे धाडस करून तो पुतळा तयार केला. शिल्पकला क्षेत्रातील हा विक्रमच त्यांनी प्रस्थापित केला. हा पुतळा करण्यापूर्वी त्यांनी शिवचरित्राचा अभ्यास केला होता. या पुतळ्यामुळे त्यांना दिगंत कीर्ती लाभली (१९२८). माकेंझी अँड मॅजेनॉन या कंपनीच्या फौंड्रीत हे ब्राँझमधील शिल्प त्यांनी घडवले. या शिल्पाचे वजन आठ टन व उंची सुमारे चार मीटर आहे.

इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथे शिवाजी महाराजांचे शिल्प साकारतानाच्या काळात त्यांचे १३ जून १९६७ रोजी निधन झाले. अलिबागमधील सासवणे येथील शिल्पकार करमरकर शिल्पालय हे त्यांचे संग्रहालय आहे. (साभार : मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## झोपण्यापूर्वी दुधात मिसळून प्या ‘ही’ एक चमचा पावडर

सध्याच्या धावपळीच्या जगात शांत आणि गाढ झोप लागणं ही सगळ्या मोठी समस्या बनली आहे. दिवसभर काम करुन शरीर थकलेलं असते, पण रात्री अंथरुणावर पडल्यावर डोळे मिटले तरी विचार थांबत नाहीत. अनेक लोक रात्रभर फक्त कूस बदलत राहतात. घड्याळाचे काटे सरकतात, पण झोप काही येत नाही. झोप पूर्ण न झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी थकवा, डोकेदुखी, चिडचिड होते आणि कामात लक्ष लागत नाही. काही जण तर झोप येण्यासाठी झोपेच्या गोळ्यांचा आधार घेतात. ज्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरु शकतात.



जर आपणही निद्रानाशाच्या समस्येने त्रस्त असाल तर स्वयंपाकघरात असणाऱ्या काही पदार्थांचे सेवन केल्यास शांत झोप लागण्यास मदत होईल. यासाठी मॅजिकल पावडर तयार करावी लागेल. जी रात्री दुधात मिसळून प्यायल्यास मिनिटांत शांत झोप लागले. या पावडरमुळे फक्त झोप लागणार नाही तर शरीरातील अशक्तपणा आणि मानसिक थकवा बरा होईल. हा उपाय नैसर्गिक असल्यामुळे ही पावडर कशी बनवायची पाहूया.

साहित्य : खारीक पाच ते सहा, बदाम १५ ते २०, भोपळ्याच्या बिया चार मोठे चमचे, खसखस दोन मोठे चमचे.

कृती : सगळ्यात आधी खारीक घेऊन त्याच्या आतील बिया काढून टाका. नंतर त्याचे बारीक तुकडे करुन कुटून घ्या. ज्यामुळे ते मिक्सरमध्ये सहज बारीक होतील. गॅसवर कढई गरम करायला ठेवा. त्यात बदाम आणि भोपळ्याच्या बिया वेगवेगळ्या पद्धतीने हलक्या भाजून घ्या. जास्त भाजू नका त्यातील ओलसरपणा निघून जाईल या पद्धतीने भाजा. आता कढईत खसखस घालून हलक्या हाताने भाजून घ्या, गॅस बंद करून कढईच्या उष्णतेवरच ती फक्त हलकी गरम करून घ्या. हे सर्व साहित्य थंड होऊ द्या. थंड झाल्यानंतर मिक्सरच्या भांड्यात घालून त्याची पावडर तयार करा. खारीक व्यवस्थित बारीक होईल याची काळजी घ्या. ही पावडर एका काचेच्या हवाबंद डब्यात भरून ठेवा.

रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दूध गरम करुन घ्या. त्या गरम दुधात एक मोठा चमचा तयार पावडर घालून व्यवस्थित मिक्स करा. दूध कोमट असताना प्या. खसखस आणि भोपळ्याच्या बियांमध्ये नैसर्गिक ट्रिप्टोफॅन आणि मॅग्नेशियम असते. जे शरीरातील स्नायूंना हलके करुन मेंदूला शांत करतात आणि गाढ झोप लागण्यास मदत करतात. बदाम आणि खारीकमुळे शरीराला ऊर्जा मिळते. रात्री हे दूध प्यायल्याने मानसिक आणि शारीरिक थकवा दूर होतो.

# लोकलमधील चाकूहल्लाप्रकरणी १२ तासांत दोन आरोपी जेरबंद

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

सीटवर बसण्याच्या कारणावरून लोकल रेल्वेत प्रवाशावर चाकूने हल्ला करणाऱ्या दोन आरोपींना कर्जत रेल्वे पोलिसांनी अवघ्या १२ तासांत अटक करून गंभीर गुन्ह्याचा उलगडा केला आहे. या प्रकरणातील आणखी एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे.



११ जून रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी सतीश कुमार बोलामनी पाठक (वय २६, रा. मस्जिद बंदर, मुंबई) हे सीएसएमटी–खोपोली लोकलच्या लगेज डब्यातून प्रवास करत होते. वांगणी रेल्वे स्थानक पार केल्यानंतर सीटवर बसण्याच्या वादातून काही तरुणांशी त्यांचा वाद झाला. यावेळी आरोपींनी पाठक यांच्या पोटात चाकूने वार करत मारहाण व शिवीगाळ केल्याची तक्रार दाखल करण्यात आली.

या प्रकरणी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच तपासाची चक्रे वेगाने फिरली. पोलीस उपनिरीक्षक प्रविण कड व गुन्हे तपास पथकाने उल्हासनगर, शेलू, नेरळ रेल्वे स्थानके तसेच नेरळ शहरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे इब्रान इद्रिस अन्सारी (रा. नेरळ) व करण कन्हैयालाल अग्रवाल (रा. शेलू) यांना ममदापूर, नेरळ येथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीनंतर दोघांना अटक करण्यात आली.

या गुन्ह्यातील सिद्धार्थ गायकवाड (रा. नेरळ) हा आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस आयुक्त (लोहमार्ग) राकेश एम. कलासागर, पोलीस उपआयुक्त प्रज्ञा जेडगे, सहाय्यक पोलीस आयुक्त नंदराज पाटील आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय भाऊ कुरुंद, गुन्हे तपास पथकाचे प्रमुख पो उप–निरीक्षक प्रवीण कड, पोहवा प्रवीण कांबळे, हमीद शेख ,सचिन चव्हाण, पोलीस अंमलदार नितीन मोहिते, चोरमले, श्रीकांत जाधव,प्रवीण मुलमुले,अक्षय पेरणेकर यांनी पार पाडली.

## बीपीसीएल कंपनीत दुसऱ्या मजल्यावरून पडून एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीत काम करत असताना दुसऱ्या मजल्यावरून खाली पडून एकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असून रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गोपाळ रेवू चव्हाण (वय ६९, रा.दापिवली, वावेघर) हा बीपीसीएल कंपनीमध्ये काम करीत असताना अचानक दुसऱ्या मजल्यावरून खाली पडला. त्यामुळे त्याला मार लागल्यामुळे त्याला तात्काळ एमजीएम रूग्णालय कामोठे येथे दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास चालू आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्याचे विद्यमान मालक **श्री. भरत सुंदरराव कदम व इतर** यांच्याकडून खरेदीखताने कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल **अंतरिक्षा अरुणकुमार गुप्ता** यांनी ठरविला आहे. त्या व्यवहाराची जाहीर नोटिस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–जुई, ता–उरण, जि–रायगड**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| १) | जुई | ५१/९ | ०.१८.४०<br>पो. ख. ०.००.००<br>एकूण ०.१८.४० | ०.३७ |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनेंस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

**उरण**
**दिनांक: १३/०६/२०२६**

**सही/–**
**ॲड. धिरज लहू डाकी**
**रा.बोरखार, पो. दिघोडे, ता. उरण,**
**जि–रायगड, मो. नं. ८१०८५४९१८३**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी **(१) श्री. गजानन धनाजी म्हात्रे (२) कुमारी. त्रतुजा प्रभाकर म्हात्रे (३) सौ. प्रमिला रमेश ठाकूर, (४) श्री. महेश सदानंद म्हात्रे, (७) श्री. रूपेश सदानंद म्हात्रे** यांच्याकडून त्यांच्या मालकी हक्कातील खालील तक्यात नमुद करण्यात आलेली **मौजे चाणजे, ता. उरण, जि. रायगड** येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ३३२/३ | ० - २८ - ६० | ० - ०० - ६० | ० - २९ - २० | ६.७५ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील जमिन मिळकतीसंदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर उल्लेखित जमिन मालक/भोगवटादार यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरच्या मिळकत हया निर्बंध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या जमिन मिळकती हया सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदर जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
**(उच्च न्यायालय वकील)**
**पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१,**
**सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई,**
**ता. आणि जि. ठाणे. मो. नं. ९६१९५०५९५८**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकार वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात–८/ जन्म १६१५/२०२६ दिनांक : १२/०६/२०२६

### "नोटीस"

**विषयः– उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :– अर्जदार श्री. भुऱ्या गोमा बांगारी, रा. मैरठी शाळा जवळ, पो. वाजे, ता. पनवेल जि. रायगड यांचा दि. १३/०४/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी श्री. भुऱ्या गोमा बांगारी , रा. मैरठी शाळा जवळ, पो. वाजे, ता. पनवेल जि. रायगड यांनी त्यांचा मुलगा कु. देवदास भुऱ्या बांगारी यांचा उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १०/०७/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त न झाल्यास मान्य करण्यात येणार नाही . हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सारंग राठोड)**
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकार वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात–८/ जन्म १६१६/२०२६ दिनांक : १२/०६/२०२६

### "नोटीस"

**विषयः– उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :– अर्जदार श्री. भुऱ्या गोमा बांगारी, रा. मैरठी शाळा जवळ, पो. वाजे, ता. पनवेल जि. रायगड यांचा दि. १३/०४/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. भुऱ्या गोमा बांगारी , रा. मैरठी शाळा जवळ, पो. वाजे, ता. पनवेल जि. रायगड यांनी त्यांचा मुलगा कु. विजय भुऱ्या बांगारी यांचा उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १०/०७/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त न झाल्यास मान्य करण्यात येणार नाही . हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सारंग राठोड)**
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-11/26-27 7000040273 | Work of supply & application of Nano Technology based Acid & Alkali resistant Nano modified anticorrosive coating on Gantry & equipment support structure & painting of MB DB at 400 kV Nagothane substation. **Tender Fee: Rs. 5,000/- + GST.** | Rs. 188.81 Lakhs Including Taxes |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 12.06.2026 at 11:00 Hrs. to 29.06.2026 up to 11:00 hrs, Opening date: 29.06.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2020-GP-7009 D मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-04-HS 1926 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2023-NP-8657A मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-43-BG 4274 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2022-GP-5384 C मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BU 8195 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/14350/A2017 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-AR 8195 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2022-GP-7856 C मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BU 7783 मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/GP/HGV/2018/3365 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BF 7783 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH-46-CG 7783 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2020-GP-1878 A मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BM 7783 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH2022-GP-3416 G मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BU 3877 चे मालक **संतोष निवृत्ती येळे** यांचे तारीख २९/११/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी सुनिता संतोष येळे फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ , २२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – सुनिता संतोष येळे ,**
**पत्ता– फ्लॅट नं बी.२२०५ प्लॅटिनम एक्सपेरिया प्लॉट नं ८२ ,**
**२२ वा मजला, सेक्टर १७ कळंबोली नोड ४१०२१८**

# सोसायट्या, संस्थांमध्ये घनकचरा व्यवस्थापन नियमांबाबत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

१ एप्रिल २०२६ पासून घनकचरा व्यवस्थापन नियम लागू झाले असून याची माहिती नागरिकांपर्यंत विविध माध्यमातून पोहचविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ५ ते ११ जून या कालावधीत विविध सोसायट्या व वसाहतींमध्ये विशेष जनजागृती करण्यात आली.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठही विभाग कार्यालय क्षेत्रात अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून संबधित स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत नागरिकांपर्यंत पोहचून घनकचरा व्यवस्थापन नियमांबाबत लोकजागृती करण्यात येत आहे.

यामध्ये से.१४,१५ ऐरोली येथील विविध सोसायट्या, दिघा कृष्णावाडी येथील त्रिमूर्ती सोसायटी, सानपाडा येथील मोराज सोसायटी, से.१२ कोपरखैरणे येथील फाम सोसायटी व से.५ येथील शकुंतला सोसायटी तसेच से.१९ ऐरोली येथील काकासाहेब थोरात सोसायटी, वाशी येथील वर्धमान पॅलेस सोसायटी, सीबीडी बेलापूर से.६ येथील वर्षा सोसायटी अशा विविध सोसायट्यांमध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम अंतर्गत निर्मितीच्या ठिकाणी घरापासूनच ओला, सुका, घरगुती घातक व सॅनेटरी अशा चार प्रकारे कचरा वर्गीकरण करावयाचा आहे याविषयी माहिती देण्यात आली.

त्याचप्रमाणे वर्गीकरण झालेला कचरा हा कचरा वाहतूक करणा-या वाहनांमध्ये वेगवेगळा देणे अत्यावश्यक असल्याचेही सूचित करण्यात आलेले आहे. दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणा-या सोसायट्या यांनी स्वतःच्या आवारात कच-याची विल्हेवाट लावणारा प्रकल्प राबविणे नव्या नियमानुसार बंधनकारक असल्याने याविषयी सोसायटी व संस्था पदाधिकारी, सदस्य यांना मार्गदर्शन करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आठही विभागांमध्ये एजी एन्व्हायरो आणि परिसर सखी या संस्थांच्या वतीने सोसायट्यांमध्ये आस्थापना व संस्था याठिकाणी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

# घणसोली विभागासाठी स्वतंत्र अग्निशामक केंद्राची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या घणसोली विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या घणसोली गाव, तळवली गाव, गोठीवली गाव, सेक्टर १ ते २५, गावठाण विभाग, झोपडपट्टी विभाग, एमआयडीसी लगतची क्षेत्रे, विविध निवासी संकुले, व्यावसायिक आस्थापना तसेच वेगाने विकसित होत असलेल्या नव्या वसाहतींची वाढती लोकसंख्या आणि वाढत्या आपत्कालीन घटनांचे गांभीर्य लक्षात घेता घणसोली विभागासाठी स्वतंत्र अग्निशामक केंद्र अथवा अग्निशामक उपकेंद्र सुरू करण्यात यावे, या मागणीचे निवेदन आरोग्य उपसभापती गणेश सकपाळ यांच्याकडून वाशी येथील जनता दरबारात वनमंत्री तथा ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार गणेश नाईक यांना सादर करण्यात आले.

घणसोली विभाग हा नवी मुंबईतील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या विभागांपैकी एक असून या विभागामध्ये हजारो कुटुंबे वास्तव्यास आहेत. उंच निवासी इमारती, गावठाण विभाग, झोपडपट्टी क्षेत्रे, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था, औद्योगिक परिसर तसेच मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या यामुळे या परिसरात स्वतंत्र अग्निशामक यंत्रणेची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या या परिसरात आग, शॉर्टसर्किट, ट्रान्सफॉर्मर जळणे, विद्युत डीपीला आग लागणे, गॅस गळती, इमारतींमध्ये नागरिक अडकणे, झाडे पडणे, घरांमध्ये पाणी शिरणे तसेच इतर नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्कालीन घटना सातत्याने घडत आहेत, मात्र अशा प्रत्येक वेळी अग्निशामक दलाला कोपरखैरणे अथवा ऐरोली येथून घटनास्थळी पोहोचावे लागते. त्यामुळे वेळ वाया जात नुकसानीचे प्रमाण वाढते.

अलीकडेच सेक्टर २१ येथील कुबेर सोसायटीमध्ये झालेल्या भीषण आगीच्या घटनेत अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. अग्निशामक दलाने बचावकार्य करून अनेक नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले असले तरी घणसोलीमध्ये स्थानिक स्तरावर अग्निशामक यंत्रणा उपलब्ध असती तर नुकसानाचे प्रमाण कमी झाले असते.

निवेदनात घणसोली सेक्टर १५ येथील एनएमएमटी बस डेपो परिसरात उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेचा वापर करून अग्निशामक उपकेंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या ठिकाणी किमान तीन ते चार अग्निशामक वाहने, रेस्क्यू व्हॅन, आपत्ती व्यवस्थापन उपकरणे, हायड्रॉलिक यंत्रणा तसेच प्रशिक्षित जवानांची नियुक्ती करण्यात यावी तसेच घणसोली विभागाच्या वाढत्या लोकसंख्येचा व भविष्यातील गरजांचा विचार करून कायमस्वरूपी स्वतंत्र अग्निशामक केंद्रासाठी जागेचे आरक्षण करून प्रशासकीय तातडीने सुरू करावी, असेही म्हटले आहे.

# मराठी लघुलेखकांवर अतिरिक्त कामाचा भार, प्रशासनाचे दुर्लक्ष?

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेत मराठी आणि इंग्रजी अशा दोन संवर्गांमध्ये लघुलेखक पदे कार्यरत आहेत. उपलब्ध माहितीनुसार, महापालिकेत लघुलेखक मराठीची ११ तर लघुलेखक इंग्रजी यांची ७ पदे कार्यरत आहेत. मात्र, महापालिकेचा बहुतांश पत्रव्यवहार, प्रशासकीय कामकाज, सभांचे इतिवृत्त आणि अधिकृत नोंदी महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मराठीतूनच होत असल्याने मराठी लघुलेखकांवर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

नुकत्याच झालेल्या २०२६च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर महापालिकेत सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, परिवहन समिती तसेच विविध विशेष सभांची संख्या वाढली आहे. या सर्व बैठकींचे इतिवृत्त तयार करण्याची जबाबदारी प्रामुख्याने लघुलेखक (मराठी) संवर्गावरच येत असल्याचे चित्र आहे. परिणामी, आधीच अपुऱ्या मनुष्यबळामुळे मराठी लघुलेखकांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून अनेक कर्मचारी मानसिक तणावाखाली काम करत असल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे, विविध विभागप्रमुखांकडून प्रत्येक विभागासाठी किमान १ मराठी लघुलेखक उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात असताना उपलब्ध पदसंख्या अत्यंत मर्यादित आहे. दुसरीकडे, इंग्रजी लघुलेखक संवर्गातील काही कर्मचारी मराठीतील कामे करण्यास अनुत्सुक असल्याची तक्रार समोर येत आहे. "आम्ही इंग्रजी लघुलेखक आहोत, मराठी लघुलेखकांचे काम आमच्या कार्यक्षेत्रात येत नाही," असे कारण देत काही कर्मचारी जबाबदारी टाळत असल्याचा आरोप कर्मचारी वर्गातून केला जात आहे.

यामध्ये आणखी एक गंभीर बाब म्हणजे महाराष्ट्र शासनाने १७ ऑक्टोबर २०२२ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी लघुटंकलेखक यांना मराठी लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या परीक्षेच्या आधारे अनेक कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीही मिळविल्याचे सांगितले जाते. मात्र पदोन्नतीसाठी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरही प्रत्यक्ष मराठीतील कामकाज स्वीकारण्यास काही कर्मचारी तयार नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

कर्मचारी संघटनांच्या मते, कामाचा संपूर्ण भार मराठी लघुलेखकांवर पडत असताना दुसऱ्या संवर्गातील कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नाही. परिणामी, कार्यक्षमता, वेळेवर कामकाज आणि कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य या सर्व बाबींवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. यामुळे नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन मराठी लघुलेखकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, तसेच शासन निर्णयानुसार पात्र असलेल्या इंग्रजी लघुलेखकांकडून मराठीतील कामकाजही करून घ्यावे, अशी मागणी कर्मचारी वर्गातून होत आहे.

# ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांच्या करारांचा कालावधी पाच वर्षांचा होणार -मंत्री गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांचा कराराचा कालावधी पाच वर्षावरून एक वर्षाचा केल्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांमध्ये असंतोष होता. ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांना या करारासाठी कागद पत्राचा सतत पाठपुरावा करावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांना करारासाठी होणारा त्रास दूर व्हावा म्हणून सानपाडा नागरिक संघाच्यावतीने विरंगुळा केंद्रांचे करार कायमस्वरूपी करावे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थसंकल्पात आर्थिक निधीची तरतूद केली आहे. हा निधी विरंगुळा केंद्राना उपलब्ध करून केंद्रांच्या विकासासाठी वापरावा, अशी लेखी मागणी महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे करण्यात आली.




सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी विरंगुळा केंद्रांच्या कराराबाबत योग्य बाजू मांडल्यानंतर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री व वनमंत्री गणेश नाईक यांनी विरंगुळा केंद्रांची करार पाच वर्षाचे करा, अशा प्रकारचे आदेश नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे आता लवकरच विरंगुळा केंद्रांच्या कराराचा कालावधी पाच वर्षाचा होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक अंदाजपत्रकात ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक निधीची तरतूद केल्याबद्दल सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ११ जून रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात ग्रहात झालेल्या जनता दरबारप्रसंगी वनमंत्री गणेश नाईक यांचे आभार मानण्यात आले. याप्रसंगी शिवसेनेचे उपशहर प्रमुख अजय पवार यांनी सानपाडा येथील पाणी टंचाई बाबत आणि पामबीच मार्गे येणारी पाण्याची ४००मिमी पाईप लाईन रेल्वे कारशेड जवळी रेल्वे ट्रॅक खालून जोडून देण्यासाठी लेखी निवेदन मंत्र्यांना दिले. वनमंत्री नाईक यांनी नवी मुंबईतील वाढती लोकसंख्या, पाऊस वेळेत न पडल्यामुळे मोरबे धरणातील पाण्याचा तुटवडा, रायगड जिल्ह्यात नवीन धरणाची निर्मिती, नवी मुंबईकरांना भविष्यात मिळणारे पाणी याबाबत सविस्तर माहिती दिली.

सत्कारप्रसंगी अध्यक्ष मारुती विश्वासराव, समाजसेवक गणेश कमळे, सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव जगदीश एकावडे, खजिनदार महादेव पाटील, उपाध्यक्ष लक्ष्मण गोळे, सीमा बोराडे, सहसचिव राजेंद्र कदम, संघाचे माजी खजिनदार विष्णुदास मुखेकर, उपाध्यक्ष बळवंतराव पाटील, माजी सहखजिनदार सुभाष बारवाल, शिवाजी पाटील, सामाजिक कार्यकर्ते रणवीर पाटील, तेजाभाई वाडेल, शिरोळे आदी ज्येष्ठ नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

# राम ते लोकनेते रामशेठ ठाकूर

रयत शिक्षण संस्था, सातारातर्फे संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा सत्कार सातारा येथे आज संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते होत आहे. त्यानिमित्त विशेष लेख...



फुले-शाहू-गाडगेबाबा-प्रबोधनकार ठाकरे हे सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजातील अगदी शेवटच्या स्तरापर्यंत गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, कौशल्याधिष्ठीत शिक्षण प्रदान करता यावे यासाठी आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्यरत राहिले. पुढे हा वारसा पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविला. फुले, शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सच्चे अनुयायी म्हणून ज्ञात असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्यशोधक समाजाचा वारसा आवर्जुन जपला.

कर्मवीरांचा सत्यशोधक वारसा जपणारा हा सच्चा रयतसेवक स्वतः कष्टाच्या अनेक झळा सहन करून उपेक्षित समाज हा सक्षम आणि समृद्ध व्हावा यासाठी अविरत कार्यरत आहे. आपण सोसलेले दुख, हाल पुढील पिढीच्या वाट्याला येऊ नये यासाठी राम झटत राहिला. रयत शिक्षण संस्थेच्या संख्यात्मक, गुणात्मक वाढीसाठी १४० कोटींपेक्षा अधिक रक्कम लोकनेते रामशेठ यांनी अगदी सहजपणे देऊ केली. त्यामध्ये कुठलाही स्वार्थ, जात, धर्म, प्रांत यामध्ये भेदभाव केला नाही. 'जिथे कमी तिथे रामशेठ' हेच सूत्र आज महाराष्ट्रामध्ये विशेषतः रयत शिक्षण संस्थेमध्ये दिसून येते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसनिमित्ताने त्यांच्या जीवनातील काही ठळक घडामोडींचा आढावा नक्कीच घ्यावा लागेल.

शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी... स्व. भागुबाई चांगू ठाकूर आणि स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पोटी २ जून १९५१ रोजी न्हावाखाडीमध्ये रामचा जन्म झाला. बालपणापासूनच अपार कष्ट हा संस्कार त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या पासून शिकून घेतलेला होता. वयाच्या पाचव्या वर्षापासून राम आपल्या आईला लाकूड फोडून देणे, विहिरीतून पिण्यासाठी पाणी आणून देणे यांसारखी अनेक काम करीत होता. १९६४मध्ये गव्हाण हायस्कूलला प्रवेश मिळाला आणि याच ठिकाणी कर्मवीरांचा सत्यशोधक वारसा जपण्याची संस्कृती त्यांच्या अंगी 'रयत'ने विकसित केली. कष्टाने जगायचे, श्रमप्रतिष्ठेला जपायचे हा संस्कार कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून त्यांना मिळाला. रयत शिक्षण संस्थेच्या संस्कृतीचा खरा वारसा रामने जपला आणि तो अविरत आपल्या आयुष्याच्या जडणघडणीमध्ये त्यांनी तो उपयोगात आणला. फक्त शिक्षणच घ्यायचे नाही; तर समाजहित, विधायक काम, व्यवहार हासुद्धा जतन करता आला पाहिजे हा महत्त्वाचा संदेश 'रयत'कडून त्यांना मिळाला. हायस्कूलचे शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्याकाळी फारशी सोय नसायची. म्हणून १९६८ साली उच्च शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ऐतिहासिक महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला.

कर्मवीरांचा 'कमवा आणि शिका' हा मूलमंत्र स्वीकारत या अभिनव प्रयोगामध्ये त्यांनी भाग घेतला. मोजक्या पैशांमध्ये फारसं भागत नव्हतं. काम करून शिकायचं, स्वावलंबी जीवन जगायचं, श्रमप्रतिष्ठा जपायची, कितीही मोठा माणूस असला तरी श्रमाला कमी लेखायचे नाही, घामाचा गंध हा सर्वात सुगंध गंध समजला जातो याची जाणीव व अण्णांचा हा संदेश रामला नेहमी होत होता. म्हणजेच रामच्या जडण-घडणीमध्ये 'रयत'चा खूप मोठा वाटा आहे याचे स्मरण राम नेहमी करून देत असतात. इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेतील विठोबा खंडाप्पा हायस्कूल' येथे १९७३ साली ते शिक्षकपदी रुजू झाले. कोणतेही काम करायचे ते निष्ठेने करायचे, त्यामध्ये गुणवत्ता असलीच पाहिजे यासाठी रामशेठ यांनी कधीही तडजोड केली नाही. दोन वर्ष विद्यार्थ्यांना मनापासून मार्गदर्शन केले. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून ते खऱ्या अर्थाने विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून नावारूपास आले. लहानपणापासूनच स्वतः गरिबी अनुभवली होती. त्यामुळे गरिबीतून अगदी शून्यातून कर्तृत्वाची उंची कशी निर्माण करता येईल याविषयी विद्यार्थ्यांना ते स्वतः समजावून सांगायचे व प्रेरित करायचे. एक हाडाचा शिक्षकच विद्यार्थ्यांना प्रेरित करू शकतो, दिशा देऊ शकतो; तेच रामशेठ यांनी केले. आयुष्य जगत असताना समस्या तर येणारच, पण त्या समस्यांना न घाबरता, समस्यांसाठी न थांबता त्या सोडवण्यावर भर त्यांचा दिसून येतो. काटाकुट्यांची वाट असूनसुद्धा त्या वाटेवरील काटे दूर करून प्रवास सहज आणि सुलभ करता येतो हा संस्कार कर्मवीर भाऊराव पाटीलांकडून शिकला आहे. त्यामुळे कितीही संकट आली तरी मागे हटायचे नाही; आपल्या कामाशी आपण प्रामाणिक राहायचे, निष्ठेने काम करायचे, गुणवत्ता जपायची हा कर्मवीरांचा विचार त्यांनी पावलोपावली जपला आणि पुढील पाठ पिढीसाठी देऊ केला.

साधारणपणे दोन वर्ष शिक्षक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी व्यवसायात जाण्याचा निर्णय घेतला. रयत शिक्षण संस्थेमधील एक निष्ठावान सच्चा सेवक शिक्षक रूपाने कमी झाला असला तरी हजारो शिक्षकांच्या बरोबरीने रामशेठ काम करीत आहेत. अध्यापनाचे काम बाजूला सारून उपेक्षित घटकातील विद्यार्थ्यांसाठी नवनवीन इमारती बांधायच्या, संगणक शाळा, प्रयोगशाळा, मुलींसाठी स्वच्छतागृह, संरक्षक भिंत, क्रीडांगण, विज्ञान प्रयोगशाळा ज्याची खऱ्या अर्थाने रयत शिक्षण संस्थेला गरज आहे. तेच रामशेठ यांनी करून दाखविले. संस्थेच्या पाचही विभागांमधील कोणतेही ग्रामस्थ त्यांच्याकडे जाऊ देत. आपली समस्या, अडचण सांगू देत रामशेठ यांनी प्रत्येकाला मदत केली आणि प्रत्येक शाळा सुसज्ज कशी होईल, विद्यार्थ्यांची सोय कशी होईल याकडे लक्ष दिले व कोट्यावधी रुपये दान दिले.

जानेवारी २०२३मध्ये मी स्वतः मोखाडा, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे माध्यमिक आश्रमशाळा व डोळखांब येथील रयत शिक्षण संस्थेच्या शाखेला भेट दिली होती. त्या आदिवासी भागात अतिशय सुसज्ज असे कॅम्पस रामशेठ यांनी निर्माण केले आहे. भारतीय संविधानानुसार कलम २१ अ प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा अधिकार आहे. तो अधिकार आदिवासी बांधवांना 'रयत'च्या माध्यमातून प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य रामशेठ यांनी केल्याचे दिसून येते, कारण त्या भागातील विद्यार्थी हे खरेच उपेक्षित आहेत, किती गरजू आहेत हे तेथील आदिवासी तांड्यावर गेल्यावरच समजते. त्या आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सुसज्ज कॅम्पस, संगणक प्रयोगशाळा, एआय तंत्रज्ञान, स्पोकन इंग्लिश यासारखे उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने कार्यरत असल्याचे दिसून आले त्याचे सर्व श्रेय आदरणीय रामशेठ यांना जाते. कारण त्यांना 'शिक्षण कुणासाठी व कशासाठी?' हे समजले आहे.

अशक्त समाजाला सशक्त करण्याचे एक कृतिशील उदाहरण म्हणजे रामशेठ आहेत. स्वतःचा संसार कुणीही करू शकतो, पण अवघाची संसार करणे सोपे नाही. रामशेठ यांनी अवघाची संसार सुखाचा, मांगल्याचा, ज्ञानसमृद्धीचा व्हावा यासाठी कित्येक दशके रयतेसाठी दिली. 'रामपर्व' या ग्रंथामध्ये वाचनात आल्याप्रमाणे रामशेठ यांनी शिक्षक पदाचा राजीनामा देऊन व्यवसायामध्ये काम करायचे ठरविले. प्रारंभी ३५ हजार रुपये किमतीचा एक जुना डंपर त्यांनी खरेदी केला त्या डंपरवर अनेक वर्ष काम करून नफा कमविला. आजही तो डंपर त्यांनी आठवण म्हणून जपलेला आहे. यावरून रामशेठ हे जुनं सोडून देत नाहीत, ते जपून ठेवतात मग ती वस्तू असो माणसं याचा प्रत्यय येतो. येणाऱ्या नवीन पिढीला रामशेठ यांचे कार्य विचार निश्चितच प्रेरणादायी व दिशा देणारे आहे.

९ मे २०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्रजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेच्या जनरल सभेमध्ये माझी संचालक मंडळावर निवड झाली. त्याचवेळी संस्थेचे आधारस्तंभ लोकनेते रामशेठ ठाकूर हेसुद्धा संचालक मंडळावर ज्येष्ठ संचालक म्हणून अनेक वर्षे काम करीत आहेत ते स्वतः माझ्याकडे आले आणि माझ्या हातात 'रामपर्व' हे पुस्तक ठेवले. मला आश्चर्याचा धक्का बसला इतका मोठा माणूस सामान्य माणसाच्या जवळ येऊन ग्रंथ भेट देतात. मला तो क्षण अतिशय हृदयस्पर्शी वाटला.

रामशेठ यांना गरिबीचा विसर नाही, कोणताही भेदभाव नाही. मोठे झाले पण माती, जमीन, आपली माणसं ते आजही विसरलेले नाहीत. मोठेपणा तर कधीच अंगाशी लावून घेतला नाही याचा प्रत्यय पुन्हा त्या निमित्ताने आला. लहानपणापासून ऐकत आलो आहे अनेक राजकीय नेते म्हणतात, मी राजकारण करत नाही समाजकारण करतो, पण प्रत्यक्षात तसे दिसून येत नाही. या उलट लोकनेते रामशेठ हे राजकारण कमी करतात, पण समाजकारण अधिक याचा प्रत्यय त्यांनी केलेल्या कामातूनच दिसून येतो. म्हणूनच रयत शिक्षण संस्थेच्या असो अथवा त्यांच्या स्वतःच्या सुसज्ज कॅम्पस असलेल्या शाळा, महाविद्यालये त्यांनी गरजूंसाठी उभी केली.

कला, संस्कृती, शिक्षण, क्रीडा क्षेत्रात चौफेर कार्य करण्याचे काम रामशेठ यांनी केलेले आहे. एवढे मोठे काम क्वचितच राजकीय मंडळींनी केले असावे. ते स्वतः दोन वेळा खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. शेतकरी, कामगार, मजूर यांचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत. आज त्यांची दोन्ही मुले आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक परेश ठाकूर हे आपल्या वडिलांच्या विचारधारेवर चालताना दिसून येतात. अनेक सामाजिक प्रश्नांची जाण व ते प्रश्न सोडवण्याची धमक त्यांच्यामध्ये दिसून येते. यामागेसुद्धा रामशेठ यांचे मार्गदर्शन असल्याचे दिसून येत आहे. आदरणीय रामशेठ तसेच शकुंतलाताईंना अमृत महोत्सवी वाढदिनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने लक्ष-लक्ष शुभेच्छा..!

**-प्रा.प्रदीप बबन हिवरकर,**
सातारा

# काशीद येथील समुद्रकिनारी अतिउत्साह बेततोय पर्यटकांच्या जीवावर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काशिद येथील समुद्र किनारा पर्यटकांचे आकर्षण आहे. या सुप्रसिद्ध पर्यटनस्थळी देश-विदेशातील पर्यटक आवर्जून येत असतात, मात्र अनेकदा सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष करून धोकादायक ठिकाणी जाणे, खोल पाण्यात उतरताना लाईक जॅकेटचा वापर न करणे या आततायीपणामुळे समुद्रात अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.



काही दिवसांपूर्वी काशीद येथील समुद्रात जळगाव जिल्ह्यातील २५ वर्षीय तरुणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला, तर दुसऱ्या तरुणाचे प्राण वाचले. येथे रोबेटिक बोयोच्या साह्याने आतापर्यंत किमान आठ पर्यटकांचे प्राण वाचवण्यात आलेले आहेत, पण काही दुर्दैवी घटनाही घडत आहेत.

काशिद समुद्राची नैसर्गिक रचना इतर समुद्र किनाऱ्यांपेक्षा थोडीफार वेगळी आहे. या ठिकाणी पहिली वाळू, नंतर खोलगट भाग व त्यात खडकाळ भाग असल्याने पर्यटकांना पोहताना अंदाज येत नाही. त्यामुळेच पर्यटकांना आपला जीव गमावावा लागतो. पर्यटकांनी सावधानता बाळगून आपला जीवलाख मोलाचा आहे हे विचारात घेऊन सजगता बाळगणे खूप जरुरीचे आहे.

काशीद समुद्र किनाऱ्याचा विस्तार खूप मोठा आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी जीवरक्षक उपलब्ध नसतात. ते लक्षात घेतया पर्यटकांनी जेथे जीवरक्षक आहेत व स्पीड बोट ज्या ठिकाणी जवळच आहेत त्या ठिकाणच्या आसपास पोहणे खूप आवश्यक आहे. पर्यटकांनी मद्यपान न करता समुद्रात पोहणे खूप उत्तम ठरणार आहे, कारण मद्यधुंद अवस्थेत पर्यटक किनाऱ्यापासून खूप लांब जातात. त्यामुळे त्यांना वाचवणे खूप कठीण होऊन जाते.

आजूबाजूला सुरूची झाडे, निळेशार पाणी यामुळे काशीद किनारा सर्वांच्या पसंतीचा आहे, पण पाण्यात बुडून मृत्यू होण्याच्या घटना घडल्यामुळे लोक भयभीत होत असतात. अशा घटना टाळण्यासाठी मनावर नियंत्रण व पोहण्यासाठी न जाणे हा उत्तम उपाय आहे.

याबाबत काशीद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे यांनी सांगितले की, पर्यटक यांनी अतिउत्साह टाळला पाहिजे. समुद्र किनारी प्रत्येक स्टॉलवर सूचना लिहिल्या आहेत, त्याचे पालन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सायरन वाजल्यावर पाण्याच्या बाहेर आले पाहिजे. स्वतःच्या जीवाला महत्त्व देऊन खोल पाण्यात न जाणे उत्तम.

*पर्यटकांनी समुद्रात उतरताना लाइफ जॅकेटचा उपयोग केला पाहिजे. जिथे जीवरक्षक व स्पीड बोट आहे तेथील लोकांना विश्वासात घेऊन आमच्यावर लक्ष ठेवा असे सांगणे खूप आवश्यक आहे. समुद्रात पोहण्यासाठी जाताना मद्य प्राशन करू नये, कारण त्यामुळे त्वरित दम लागतो व किनारा गाठता येत नाही. अतिउत्साह टाळावा व स्वतः सुरक्षित राहण्यासाठी पोहणे टाळावे.*

**-परशुराम कांबळे,**
पोलीस निरीक्षक, मुरूड पोलीस ठाणे

# सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व डिझेल इंजिन देखभाल, परिचालन प्रशिक्षणासाठी अर्जाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, रायगड-अलिबाग येथे १ जुलैपासून प्रशिक्षण सत्र सुरू होत आहे. यासाठी जिल्ह्यातील युवकांनी ३० जूनपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी महेश खरात यांनी केले आहे.

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सहा महिने मुदतीचे प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रात्यक्षिक व सिध्दांतिक ज्ञान दिले जाते. याचा प्रशिक्षण कालावधी १ जुलै ते ३१ डिसेंबर (सहा महिने) आहे. याकरिता उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असावे. आधारकार्ड व रेशनकार्ड छायाप्रत जोडणे. उमेदवार किमान चौथी पास असणे आवश्यक, शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक, क्रियाशील मच्छीमार व किमान एक वर्ष मासेमारीचा अनुभव असावा तसेच विहित नमुन्यातील अर्जावर मच्छिमार सहकारी संस्थेची शिफारस घ्यावी. उमेदवारास पोहता येणे आवश्यक आहे. प्रशिक्षण शुल्क :प्रतिमाह ४५० रुपयेप्रमाणे सहा महिन्यांचे २७०० रु. दारिद्र्यरेषेखालील असल्यास प्रतिमाह १०० रुपयेप्रमाणे सहा महिन्यांचे ६०० रु., मात्र (दारिद्र्यरेषेखालील उत्पन्नाचा गटविकास अधिकारी यांचा दाखला जोडावा.)

प्रशिक्षणामुळे रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी असून राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) अंतर्गत योजनेतून अर्थसहाय्य घेऊन मच्छिमारी नौका बांधता येते. सरकारी किवा खासगी विभागांच्या सागरी नौकांवर पात्रतेनुसार खलाशी म्हणून रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते.

संपर्कासाठी पत्ता महेश किसन खरात, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी मो.क्र.७७५८९६९११२ किंवा धीरज शहुराव भोयर, मोबाईल व व्हॉट्सअॅप क्र. ९८६०२५४९४३, यांत्रिक निदेशक, रायगड-अलिबाग, मत्स्यसंकुल इमारत, अलिबाग कोळीवाडा, कस्टम कार्यालयाच्या बाजूला,अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड. पिन-४०२२०१ ई-मेल : ftoalibag@rediffmail.com असा आहे.

इच्छुक युवकांनी या प्रशिक्षण केंद्राशी किंवा मोबाईल व व्हॉट्सअॅप मो.क्र.७७५८९६९११२ व क्र. ९८६०२५४९४३ सपर्क साधल्यास विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध करुन देण्यात येइल. अर्ज स्वतःचे हस्ताक्षरात भरून त्यावर संस्थेची शिफारस घेऊन ३० जूनपर्यंत कार्यालयीन वेळेत कामकाजाचे दिवशी वर नमूद व्हॉट्सअॅप किंवा ई-मेल सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वेळास समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवेआगरच्या शेजारी वसलेला निसर्गरम्य वेळास समुद्रकिनारा हा पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे, मात्र वाढत्या पर्यटनामुळे किनाऱ्यावर प्लास्टिक, पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे वेष्टन आणि इतर टाकाऊ वस्तींमुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या पार्श्वभूमीवर सलग दोन दिवस समुद्रकिनारा स्वच्छ करण्याची मोहीम राबवण्यात आली.

धवल तवसाळकर व सहकारी युवकांनी पहाटेपासून सायंकाळपर्यंत समुद्रकिनाऱ्यावर विखुरलेला कचरा गोळा केला. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल, पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांचे डबे, काचेचे तुकडे तसेच इतर टाकाऊ साहित्य वेगळे करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. या उपक्रमामुळे वेळास किनाऱ्याचे सौंदर्य पुन्हा खुलून आले असून परिसर अधिक स्वच्छ आणि आकर्षक बनला आहे.

वेळास हे केवळ सुंदर समुद्रकिनाऱ्यासाठीच नव्हे तर कासव संवर्धनासाठी देशभर प्रसिद्ध आहे. दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देत असतात.

या उपक्रमाला स्थानिक ग्रामस्थ, पर्यटक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या युवकांमध्ये ओंकार कोडेरे, साहिल घोळे, साहिल पवार, अतिश अपराध, क्रिश जाधव, अनुज अपराध, आयुष दिवेकर आणि धवल तवसाळकर यांचा समावेश होता.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २०/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात क्रिटीकल मिनरल प्रक्रिया पार्क विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव-विनंती अर्ज. | -- |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १५/०६/२०२६ ते दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १६/०६/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १७/०६/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. मंगल प्यारेलाल परमार, २) श्री. राजेंद्र रघुनाथ परमार, ३) श्री. रणजीत प्रेमचंद ओसवाल, ४) श्री. हेमंत मोतीलाल शाह यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमिन आमचे अशिलांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. व या व्यवहाराची जाहिर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालक यांनी दिलेल्या सहमतीने सदरची पेपर नोटीस देण्यात येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तुपगाव, तालुका खालापूर, जिल्हा रायगड.**

| मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| ७०५ | विटाच्या भिंती, सिमेंटचे पक्के घर | २९६.९२ |
| ७०६ | मोकळी जागा | ५१२.७३ |
| ७०७ | विटाच्या भिंती, सिमेंटचे पक्के घर | ७३.१६ |
| ७०८ | मोकळी जागा | ७६२.५५ |

वरील वर्णन केलेल्या मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबेकब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांने दिल्यावरून वरील खरेदीदारांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटनेस मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तिंना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबधिच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत आणुन द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकती निर्वेध आहे असे समजुन वरील खरेदीदार सदर व्यवहार पुर्ण करतील व नंतर कोणाचीही कसूलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : १२/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. संदीप हरिश्चंद्र बटवाल**
**पत्ता-१०३, आशादिप अपार्टमेंट, अनिल झेरॉक्सच्या वर, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**मोबा.नं. ९८६९४७९२११**


# सायंकाळी आकाशात होतेय ढगांची दाटी

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणात सध्या दिवसभर उन्हाचा कडाका जाणवत असला तरी सायंकाळच्या वेळी अचानक आभाळ भरून येत आहे. काळ्या ढगांची गर्दी, थंडगार वाऱ्याची झुळूक आणि निसर्गाच्या कुशीत दिसणारा सूर्यास्त यामुळे परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून सायंकाळी आकाशात विविध आकारांचे ढग दाटून येत असून सूर्यास्ताच्या वेळी सोनेरी किरणे आणि ढगांचा सुंदर मिलाफ पहायला मिळत आहे. बांबूच्या बनातून आणि हिरव्यागार झाडांच्या फांद्यांतून दिसणारा हा नजारा निसर्गप्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे.

शेतकरी वर्गही पावसाच्या प्रतीक्षेत असून खरीप हंगामाच्या तयारीला लागला आहे. आभाळ भरून येणे, वातावरणातील गारवा वाढणे आणि ढगांची सतत होणारी वर्दळ यामुळे लवकरच मान्सूनच्या आगमनाची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सायंकाळच्या वेळी निसर्गाने उधळलेले रंग आणि सूर्यास्ताचे मोहक दृश्य पाहण्यासाठी अनेक जण गावाबाहेरील डोंगर, माळरान आणि जंगल परिसरात गर्दी करत आहेत. पावसाळ्याच्या आगमनापूर्वी निसर्गाने साकारलेले हे रमणीय रूप सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे.


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
Email: panvelcorporation@gmail.com

**प्रति**
**श्री./श्रीमती. ......................................................**
**मा. सदस्य/सदस्या,**
**पनवेल महानगरपालिका**

संदर्भ :

१. पनवेल महानगरपालिका सर्व साधारण सभा क्र.५, बुधवार दिनांक २०/०५/२०२६ रोजीची विषयपत्रिका.
२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील दिनांक १८/०५/२०२६ रोजीचे पत्र.
३. पनवेल महानगरपालिका, सचिव कार्यालय यांचे दिनांक १९/०५/२०२६ रोजीचे शुद्धीपत्रक.
४. मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील दिनांक ०५/०६/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

संदर्भ क्र. १ अन्वये पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. ५ बुधवार, दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र. २ अन्वये भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा करण्यात आल्याने रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू झाली. त्यानुषंगाने, संदर्भ क्र. ३ अन्वये पनवेल महानगरपालिकेची दिनांक २०/०५/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा आचारसंहिता कालावधीकरिता स्थगित करण्यात आली होती. संदर्भ क्र. ४ अन्वये रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध झाल्याने आदर्श आचारसंहिता संपुष्टात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आलेली पनवेल महानगरपालिकेची दिनांक २०/०५/२०२६ रोजीची सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर सभेचे कामकाज सर्वसाधारण सभा क्र. ०५, दिनांक २०/०५/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेनुसार करण्यात येईल.

**(मा. महापौर यांचे आदेशान्वये व मंजूरीने)**

**जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/**
**प्र.क्र.०५/२१३/२६**
**दिनांक :-१२/०६/२०२६**

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**



## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**ई- निविदा सुचना**
**मलनिःस्सारण विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार, किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी ई निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ SEWERAGE /०१/२०२६-२७ | पनवेल महानगरपालिका मालकीच्या कामोठे, सेक्टर-३२ येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया (STP) केंद्रांचे नुतनीकरण करुन दोन वर्षाकरीता परिचलन, निगा, दुरुस्ती करणे. | रु.३९,२८,०४,१८७/- (रु.३५,१७,०३,५६०/- Biddable amount + रु.४,११,००,६२७/- Non-Biddable amount) | १९,६४,१००/- | ३,५४०/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १५/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.पमपा/मल.वि/२२२५/प्र.क्र.०२/५२१/२०२६/**
**दिनांक :-१२/०६/२०२६**

**सही/-**
**अतिरीक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ८१ | – | ० – ७९ – ७० पो. ख. ० – २८ – ८० एकूण क्षेत्र १ – ०८ – ५० | ८.०३ | १) दिलीप शंकरलाल जैन, २) विजयालक्ष्मी दिलीपकुमार खरोदिया |

वरील **एकूण क्षेत्र १ – ०८ –५० हे. आर. पॉ.** पैकी **१) दिलीप शंकरलाल जैन, आणि २) विजयालक्ष्मी दिलीपकुमार खरोदिया, खाते क्रमांक ३०३** यांचे हिश्याचे **क्षेत्र ० – ४४ – ०० हे. आर. पॉ., आकार ४.४३ रू. पैसे** या मिळकतीची....

**सही/-**
पनवेल.
दिनांक : १२/०६/२०२६.

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# मेक्सिकोकडून द. आफ्रिकेचा धुव्वा

## मृत्यूच्या दारातून परतलेल्या जिमेनेझचा फिफा वर्ल्डकपमध्ये गोल

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

मेक्सिकोच्या संघाने घरच्या मैदानातील उद्घाटन सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा २-० अशा धुव्वा उडवत यंदाच्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या हंगामाची सुरुवात दिमाखदार विजयाने केली. या सामन्यात मेक्सिकोचा स्ट्रायकर राउल जिमेनेझ याने ऐतिहासिक गोल डागला.

सामन्याच्या नवव्या मिनिटाला ज्युलियन क्विनोन्सने पहिला गोल करत मेक्सिकोला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ६७व्या मिनिटाला जिमेनेझने दुसरा गोल करत संघाचा विजय निश्चित केला.

३५ वर्षे ८४ दिवस वयात जिमेनेझने वर्ल्डकप स्पर्धेतील आपला पहिला गोल केला. हा एक विक्रमच आहे. विशेष म्हणजे मृत्यूला हरवून मैदानात उतरत जिमेनेझ याने ही कामगिरी करून दाखवली आहे. जिद्दीच्या जोरावर त्याने केलेले कमबॅकची स्टोरी प्रेरणादायी अशीच आहे.




सहा वर्षांपूर्वी २९ नोव्हेंबर २०२० रोजी इंग्लंडमध्ये क्लब फुटबॉल खेळताना जिमेनेझचा डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्याच्या कवटीला फ्रॅक्चर झाले आणि त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली. डॉक्टरांनी त्याचा जीव वाचवला, पण या दुखापतीतून सावरून तो पुन्हा फुटबॉलच्या मैदानात उतरेल, याची कल्पनाही कुणी केली नव्हती.

जवळपास नऊ महिन्यांच्या पुनर्वसनानंतर तो फुटबॉलच्या मैदानात परतला. कायमस्वरूपी संरक्षक हेडबँड घालून पुन्हा जिद्दीने त्याने आपल्यातील क्षमता सिद्ध करण्यासाठी सर्वस्व झोकून दिले. दुखापतीतून कमबॅक करणे कोणत्याही खेळाडूसाठी सहज सोपी गोष्ट नसते. तोही याला अपवाद नव्हता. दुखापत आणि खराब फॉर्ममुळे २०२२च्या विश्वचषकातही तो चमकू शकला नाही, पण जिमेनेझने हार मानली नाही. क्लब आणि राष्ट्रीय संघासाठी सातत्याने मेहनत घेत त्याने पुन्हा आपली गोल करण्याची क्षमता सिद्ध केली.

गत हंगामात फिटनेसमुळे फक्त बदली खेळाडूच्या रूपात मैदानात उतरलेल्या राऊल जिमेनेझ हा २०१४पासून मॅक्सिको संघाकडून वर्ल्डकप खेळत आहे, पण तीन हंगामात त्याला एकही गोल करता आला नव्हता. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा गोल केल्यावर त्याला अश्रू अनावर झाले. त्याची कहाणी ही फक्त फुटबॉलची नाही; तर जिद्द, धैर्य आणि कधीही हार न मानण्याच्या वृत्तीची आहे.

# केन विल्यमसनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून अचानक निवृत्ती

## कसोटी मालिकेदरम्यान मोठा निर्णय

**लंडन : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा दिग्गज खेळाडू केन विल्यमसनने अचानक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांची कसोटी मालिका सुरू असतानाच विल्यमसनने हा मोठा निर्णय घेतला आहे.

विल्यसमनच्या निवृत्तीच्या घोषणेसह त्याच्या १६ वर्षांच्या गौरवशाली आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्णविराम लागला आहे. २०१०मध्ये न्यूझीलंडकडून पदार्पण करणाऱ्या विल्यमसनने आपल्या देशासाठी ३७८ आंतरराष्ट्रीय सामने खेळले. या काळात त्याने फलंदाजीत अनेक विक्रम नावे केले आणि जगभरातील क्रिकेटप्रेमींचा आदर व प्रशंसा मिळवली. ३५ वर्षीय विल्यमसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण १९,३४६ धावा करत न्यूझीलंडचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू



म्हणून कारकीर्द संपवली. त्याच्या नावावर ४८ शतके आणि सहा द्विशतकांची नोंद आहे.

फलंदाज म्हणून अफाट यश मिळवण्याबरोबरच विल्यमसनचे नेतृत्वही तितकेच प्रभावी ठरले. २०१६ ते २०२४ या काळात त्याने तिन्ही प्रकारांत न्यूझीलंड संघाचे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंडने दोन आयसीसी विश्वचषकांच्या अंतिम फेरी गाठल्या, तीन वेळा उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि २०२१मध्ये पहिल्या आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचे विजेतेपदही पटकावले. गेल्या नोव्हेंबरमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटला पूर्णविराम देण्याची ही योग्य वेळ असल्याचे विल्यमसनने सांगितले.

> **मी या निर्णयाचा बराच काळ विचार करत होतो, मात्र गेल्या काही दिवसांत मला स्पष्टपणे जाणवले की आता निवृत्ती घेण्याची हीच योग्य वेळ आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटबद्दल माझ्या मनात नेहमीच प्रचंड जिद्द आणि भूक होती. न्यूझीलंडसाठी खेळलेल्या प्रत्येक सामन्यात मी माझे सर्वस्व दिले याचा मला अभिमान आहे.**
>
> **-केन विल्यमसन**

# नॉर्वेच्या फुटबॉलपटूंसाठी मायदेशातून पारंपरिक खाद्यपदार्थ अमेरिकेत दाखल

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

तब्बल २८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नॉर्वेचा फुटबॉल संघ फिफा विश्वचषक २०२६च्या रणांगणात रणशिंग फुंकण्यासाठी अमेरिकेत दाखल झाला आहे. १९९८नंतर पहिल्यांदाच विश्वचषकाच्या मुख्य फेरीत धडक मारणाऱ्या नॉर्वेने केवळ मैदानातील रणनीतीवरच नाही, तर खेळाडूंच्या ऊर्जेचा स्रोत असलेल्या आहारावरही विशेष लक्ष केंद्रित केले आहे.


मँचेस्टर सिटीचा स्टार गोलमशीन एर्लिंग हालँड आणि आर्सेनलचा कल्पक कर्णधार मार्टिन ओडेगार्ड यांसारख्या दिग्गज शिलेदारांना मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करता यावी यासाठी नॉर्वेने एक अनोखी आणि भव्य तयारी केली आहे. घरच्या मैदानापासून हजारो मैल दूर असतानाही खेळाडूंना मातृभूमीतील अन्नाची चव आणि ताकद मिळावी म्हणून नॉर्वेमधून थेट अमेरिकेत तब्बल एक हजार किलोपेक्षा जास्त पारंपरिक खाद्यपदार्थांचा साठा विमानाने पाठवण्यात आला आहे.

या ऐतिहासिक मोहिमेअंतर्गत नॉर्वेच्या संघाने आपल्या ते ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत तिथे तळावर ३०० किलो पारंपरिक नॉर्वेजियन मासे, ११६ किलो तेथील प्रसिद्ध 'ब्रूनोस्ट' (ब्राउन चीज) आणि तब्बल सहा हार रसाळ संत्री आणली आहेत.

# फिफा विश्वचषकात गिलबर्टो मोराने मोडला ९६ वर्षांचा विक्रम

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात मेक्सिकोच्या एस्टाडिओ अझ्टेका स्टेडियमवर एका नव्या इतिहासाची नोंद झाली. मेक्सिकोने दक्षिण आफ्रिकेचा २-० असा पराभव केला, पण या सामन्यात साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले ते १७ वर्षांच्या गिलबर्टो मोराने. विश्वचषकाच्या मैदानात पाऊल टाकताच मोरा हा फिफा विश्वचषकात खेळणारा मेक्सिकोचा आजवरचा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे, तर जागतिक फुटबॉलच्या इतिहासातील तो सहावा सर्वात युवा खेळाडू बनला आहे.



सामन्याच्या ६५व्या मिनिटाला जेव्हा मोराने मैदानात प्रवेश केला, तेव्हा मेक्सिको सिटीतील खचाखच भरलेल्या स्टेडियमने टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी बॉक्सिंग जगतातील सुपरस्टार कॅनेलो अल्वारेझसारखे दिग्गजही स्टेडियममध्ये उपस्थित होते. अवघ्या १७ वर्षे आणि २४० दिवस वय असलेल्या मोराने तब्बल ९६ वर्षांपूर्वीचा म्हणजेच १९३०मधील पहिल्या विश्वचषकापासूनचा विक्रम मोडीत काढला.

यापूर्वी हा विक्रम मॅन्युएल रोझासच्या नावावर होता. रोझासने ९६ वर्षांपूर्वी फ्रान्सविरुद्ध खेळताना मेक्सिकोचे प्रतिनिधित्व केले होते, तेव्हा त्याचे वय १८ वर्षे आणि १३४ दिवस होते. विश्वचषकाच्या इतिहासात मोरापेक्षा लहान वयात पदार्पण करणाऱ्यांमध्ये आता केवळ पेले (१७ वर्षे २३५ दिवस), सालोमन ओलेम्बे, फेमी ओपाबुनमी, सॅम्युअल इटो आणि नॉर्दर्न आयर्लंडचा नॉर्मन व्हाइटसाइड (१७ वर्षे ४१ दिवस) या मोजक्या दिग्गजांचा समावेश आहे.

१४ ऑक्टोबर २००८ रोजी दक्षिण मेक्सिकोतील तुक्स्टला गुटीरेझ येथे जन्मलेला मोरा हा 'क्लब तिजुआना'च्या युवा अकादमीतून पुढे आला. त्याने वयाची १६ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच 'लिगा एमएक्स'मध्ये पदार्पण केले होते. आक्रमक मिडफिल्डर म्हणून खेळणाऱ्या मोराकडे खेळाची कमालीची समज, सर्जनशीलता आणि दबावाच्या परिस्थितीतही शांत राहून खेळण्याचे अफाट कौशल्य आहे. म्हणूनच वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी त्याने तिजुआना क्लबसाठी ५०हून अधिक सामने खेळले आहेत. २०२५मध्ये चिली येथे झालेल्या फिफा अंडर-२० विश्वचषकात मेक्सिकोला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहचवण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

# नेमबाज, प्रशिक्षक जसपाल राणा यांचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचे महान नेमबाज आणि राष्ट्रीय पिस्टल संघाचे हाय-परफॉर्मन्स प्रशिक्षक जसपाल राणा यांचे शुक्रवारी (दि.१२) वयाच्या अवघ्या ४९व्या वर्षी निधन झाले. या आठवड्याच्या सुरुवातीला त्यांना झालेल्या अचानक वैद्यकीय इमर्जन्सीमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यांची प्राणज्योत अखेर मालवली.

मिळालेल्या माहितीनुसार जर्मनीतील म्युनिच येथे पार पडलेल्या आयएसएसएफ वर्ल्ड कपवरून भारतात परतत असताना जसपाल राणा यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. नवी दिल्ली विमानतळावर उतरल्यानंतर त्यांना तातडीने साकेत येथील मॅक्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

१९९०च्या दशकात जसपाल राणा यांनी आंतरराष्ट्रीय नेमबाजीच्या पटलावर भारताचा दबदबा निर्माण केला होता. आशियाई, राष्ट्रकुल आणि आशियाई चॅम्पियनशिपमध्ये त्यांनी भारतासाठी अनेक सुवर्ण आणि इतर पदकांची कमाई केली. त्यांच्या जाण्याने क्रीडा जगताचे कधीही भरून न निघणारे मोठे नुकसान झाले आहे.

# बांगलादेशकडून 'कांगारूं'ची शिकार!

## ऑस्ट्रेलियाविरूद्ध पहिल्यांदाच वनडे मालिका जिंकली

**मिरपूर : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाने मोठा इतिहास रचला. एकदिवसीय मालिकेत विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत करून बांगलादेशने २३ वर्षांनंतर वनडे मालिका जिंकली.



मिरपूरच्या शेर-ए-बांगला राष्ट्रीय स्टेडियमवरील सामन्यात विजय मिळवत बांगलादेशने ऑस्ट्रेलियाविरुद्ध प्रथमच द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकली. पावसामुळे बाधित झालेल्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीनुसार बांगलादेशला ४१ षटकांत १९२ धावांचे लक्ष्य देण्यात आले होते. त्यांनी ३६ चेंडू शिल्लक असताना पाच गडी राखून हे लक्ष्य पूर्ण केले.

नाहिद राणा ऐतिहासिक मालिका विजयाचा सुपरस्टार ठरला. या तरुण वेगवान गोलंदाजाने आपल्या वेगाने आणि आक्रमक गोलंदाजीने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना बॅकफूटवर ढकलले. पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याच्या आखूड चेंडूंनी ऑस्ट्रेलियन फलंदाजांना मोकळेपणाने बॅट फिरवताच आली नाही. एखाद्या बांगलादेशी वेगवान गोलंदाजाने जागतिक क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाला अशाप्रकारे अडचणीत आणल्याचे चित्र बरेच वर्षांनी दिसले.

तस्किन अहमद, नाहिद राणा आणि मुस्तफिजुर रहमान या त्रिकुटाने संपूर्ण मालिकेत ऑस्ट्रेलियन फलंदाजांवर वर्चस्व गाजवले. गोलंदाजीचा वेग, स्विंग आणि विविधता याच्या बळावर बांगलादेशने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाला पळता भुई थोडी केले.

# 'वूमन्स इन ब्लू' यंदा टी-२० वर्ल्डकप जिंकणार का?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषकातील विजेतेपदाचा दुष्काळ संपवल्यानंतर आता भारतीय संघाचे लक्ष पहिल्या टी-२० विजेतेपदावर आहे. भारतीय संघ १४ जून रोजी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. स्पर्धेपूर्वी यजमान इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला तसेच विश्वचषकापूर्वी इंग्लंडविरुद्धची टी २० मालिकाही संघाने १-२ अशा फरकाने गमावली होती. संघासमोर काही आव्हाने आणि काही जमेच्या बाजू आहेत.

भारताचे यश बऱ्याच अंशी स्मृती मानधना आणि शफाली वर्मा या सलामीच्या जोडीवर अवलंबून असेल. सध्या ही जोडी खराब फॉर्ममध्ये असल्याचे दिसून येत आहे. स्मृतीने तिच्या गेल्या सहा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकही अर्धशतक झळकावलेले नाही, तर शफालीचा अलीकडील फॉर्मही चिंतेची बाब आहे. जर ही जोडी चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरली, तर भारतीय संघाच्या अडचणी वाढू शकतात.

भारतीय महिला संघाने जरी एकदिवसीय विश्वचषक जिंकला असला, तरी टी-२०मध्ये दडपणाचा सामना करणे हे एक मोठे आव्हान राहिले आहे. विशेषतः 'डेथ ओव्हर्स'मध्ये गोलंदाजी करताना किंवा डाव आणि सामना फिनिश करताना. फलंदाजीच्या बाबतीत संघ मोठ्या प्रमाणावर रिचा घोषवर अवलंबून



आहे. इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात हे स्पष्ट झाले होते. गोलंदाजी आघाडीवर रेणुका ठाकूर, राधा यादव आणि दीप्ती शर्मा यांसारख्या अनुभवी खेळाडूंना जबाबदारी पेलावी लागेल. याव्यतिरिक्त फलंदाजीत राधा, दीप्ती आणि भारती फुलमाळी यांना रिचाला साथ द्यावी लागेल.

या टी-२० विश्वचषकात अनुभव ही भारतीय महिला संघाची सर्वात मोठी ताकद आहे; संघात अनुभवी खेळाडू आहेत. अगदी युवा शफाली वर्माकडेही अनेक वर्षांचा अनुभव आहे. त्याचबरोबर उपकर्णधार स्मृती मानधना आणि मधल्या फळीतील फलंदाज व कर्णधार हरमनप्रीत कौर या आपल्या कारकिर्दीतील १०वा विश्वचषक खेळणार आहेत. याव्यतिरिक्त अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा, मधल्या फळीतील मुख्य आधारस्तंभ जेमिमाह रॉड्रिग्ज आणि सर्वात अनुभवी गोलंदाज रेणुका ठाकूर संघाचा भक्कम आधार आहेत. हा अनुभव भारताला महिला टी-२० विश्वचषकाचे पहिले जेतेपद मिळवून देण्यात मदत करेल का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

### 'ग्रुप ऑफ डेथ'चे आव्हान

याला भारतीय महिला संघाची कमजोरी म्हणता येणार नाही, पण आव्हानांचा विचार करता सर्वात मोठे अडथळे म्हणजे त्यांचा गट अजिबात सोपा नाही. या गटात भारतासोबत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेसारखे बलाढ्य संघ आहेत. चिंतेची बाब म्हणजे भारतीय संघाला या दोन्ही संघांविरुद्ध खेळताना सातत्याने संघर्ष करावा लागला आहे. शिवाय याच गटात बांगलादेश आणि पाकिस्तानचाही समावेश आहे आणि त्यांनाही कमी लेखून चालणार नाही. परिणामी या स्पर्धेत 'गट अ' हा अत्यंत कठीण गट ठरू शकतो.

# सचिन तेंडुलकरचे विमानात 'फॅमिली क्रिकेट'



**मुंबई : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर पुन्हा एकदा सोशल मीडियावर जोरदार चर्चेत आला आहे. सचिनने नुकताच त्याच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो मैदानात नव्हे, तर थेट एका प्रायव्हेट जेट (विमानात) मध्ये क्रिकेट खेळताना दिसत आहे.

व्हिडीओमध्ये सचिन तेंडुलकर विमानाच्या केबिनजवळ हातात बॅट घेऊन फलंदाजी करताना दिसत आहे, तर त्याची सून सानिया चांडोक लाल रंगाच्या चेंडूने गोलंदाजी करत आहे. त्यासोबतच सचिनची मुलगी सारा फिल्डिंग करताना दिसत आहे. कुटुंबातील इतर सदस्यही या क्षणाचा आनंद घेताना दिसत आहेत. हा व्हिडीओ शेअर करताना सचिनने एक मजेशीर कॅप्शन लिहिले आहे, "अल्टिट्युड (उंची) काहीही असो, ॲटिट्युड (क्रिकेटप्रतीची आवड) बदलला नाही पाहिजे."

हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून चाहत्यांनी सचिनच्या साधेपणाचे आणि क्रिकेटवरील प्रेमाचे कौतुक केले आहे. अनेक चाहत्यांच्या मते, क्रिकेट सचिनच्या रक्तात असून तो कुठेही गेला तरी क्रिकेट खेळायला विसरत नाही.

# दक्षिण कोरियाची झेकिया संघावर मात

**ग्वाडलाहारा : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत दक्षिण कोरियाने गुरुवारी ग्वाडलाहारामध्ये झालेल्या ग्रुप 'अ'मधील सामन्यात श्वास रोखून धरायला लावणाऱ्या सामन्यात झेकियाचा २-१ असा पराभव केला. या सामन्यात ह्वँग इन-बीआम याने एक गोल करत तसेच एक असिस्ट देत सामन्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अखेरच्या अर्ध्या तासात त्याच्या खेळामुळे सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. संपूर्ण सामन्यात दक्षिण कोरियाचा संघ अधिक आक्रमक आणि प्रभावी दिसत होता.

दक्षिण कोरियाचा कर्णधार हेंग-मिन सोन याने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळाची धुरा सांभाळली, पण या सामन्यात ५९व्या मिनिटाला झेकियाच्या कर्णधार लादिस्लाव क्रेजीने हेडरवर



अप्रतिम गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. ही आघाडी फार काळ टिकली नाही. ६७व्या मिनिटाला ह्वांग इन-बेओमने गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला.

श्वास रोखून धरायला लावणाऱ्या या लढतीत ७७व्या मिनिटाला टॉमस सौसेकने फ्री-किकवर हेडरने गोल केला. झेकियाच्या खेळाडूंनी जल्लोषही सुरू केला, मात्र असिस्टंट रेफरीने ऑफसाईडचा झेंडा दाखवल्याने हा गोल रद्द करण्यात आला. यानंतर तिसऱ्या मिनिटांत दक्षिण कोरियाने सामन्याचा कल पूर्णपणे बदलला. बदली खेळाडूच्या रुपात मैदानात उतरलेल्या ओह ह्योन-ग्यू याने ८०व्या मिनिटाला गोल करत संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली.

# अफगाणिस्तान 'अ' संघ विजयी

**दांबुला : वृत्तसंस्था**

श्रीलंकेत सुरू असलेल्या त्रिदेशीय 'अ' संघ मालिकेत गुरुवारी एक मोठा उलटफेर पाहायला मिळाला. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत अफगाणिस्तान 'अ' संघाने भारताचा डकवर्थ-लुईस नियमाच्या आधारे चार धावांनी पराभव केला. या निकालामुळे स्पर्धेतील समीकरणे पूर्णपणे बदलली असून २१ जून रोजी होणाऱ्या फायनलची शर्यत आता रंजक झाली आहे.



भारताने उभारलेल्या ३४९ धावांच्या डोंगराएवढ्या आव्हानानंतरही पावसाने सामन्यात खोडा घातल्यामुळे टीम इंडियाला या पराभवाचा सामना करावा लागला. भारताच्या डावानंतर आलेल्या पावसामुळे अफगाणिस्तानला ३८ षटकांत २९४ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले. प्रत्युत्तरादाखल अफगाणिस्तानचा कर्णधार इम्रान (नाबाद ७५) आणि बहिर शाह (५१) यांनी भारतीय गोलंदाजांवर दबाव आणला. जेव्हा २५.५ षटकांत अफगाणिस्तानचा स्कोअर २ बाद १७७ होता, तेव्हा पुन्हा एकदा मुसळधार पाऊस सुरू झाला. पुढे खेळ होऊ शकला नाही आणि 'डीएलएस'च्या हिशोबानुसार अफगाणिस्तानचा संघ पार-स्कोअरपेक्षा चार धावा पुढे असल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com